
रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ४९
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## नागपुरात डीजे, डॉल्बी साऊंड सिस्टिमवर बंदी



**नागपूर :** ध्वनीप्रदूषण आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी डीजे वाजवण्यावर निर्बंध लावण्यात यावे अशी मागणी पुण्यात जोर धरत असताना नागपूर पोलिसांनी तीन महिन्यांसाठी 'डीजे'वर बंदी घातलेली आहे. या संदर्भात नागपूरचे पोलीस आयुक्त विश्वास नागरे पाटील यांच्या आदेशाने अधिसूचना जारी करण्यात आली आहे. आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर मोठ्या क्षमतेचे डीजे, डॉल्बीसह प्लाझमा आणि प्रेशरमिड साऊंड सिस्टिम वाहनांचा वापर करण्यावर बंदी घालण्यात आली आहे. ४ सप्टेंबरच्या मध्यरात्रीपासून ते १ नोव्हेंबरला रात्री ११.५९ वाजेपर्यंत संबंधित सिस्टिम आणि वाहने सीलबंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तथापि, निर्धारित ध्वनी मर्यादेचे पालन करणाऱ्या साऊंड सिस्टिमला या आदेशातून वगळण्यात आले आहे.

## अंतरंग

माणगाव बायपाससह महामार्ग जानेवारीपर्यंत पूर्ण होणार/२

ग्रामसभेत घरकुल यादीवरून वाद; सदस्यांना मारहाण/५

आशियाई स्पर्धेसाठी लक्ष्मण पुरुष क्रिकेट संघाचा कोच/८

# कोकणवासीयांना गणेशोत्सवाची भेट!

■ मुंबई-सावंतवाडी दैनिक एक्स्प्रेस सेवा सुरू



**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या ऐन तोंडावर कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी आणि स्थानिक रहिवाशांसाठी सरकारने मोठा दिलासा दिला आहे. मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते सावंतवाडी रोडदरम्यान धावणाऱ्या नवीन नियमित (दैनिक) एक्स्प्रेस ट्रेनचा गुरुवारी (दि.३) औपचारिक शुभारंभ करण्यात आला.

कोकण रेल्वेमार्गावरील वाढती गर्दी आणि प्रवाशांची दीर्घकाळापासूनची मागणी लक्षात घेऊन ही नवी रेल्वेसेवा सुरू करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या दैनिक रेल्वेमुळे मुंबई-कोकण प्रवास अधिक गतिमान, आरामदायी आणि सोयीस्कर होणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे आयोजित एका विशेष कार्यक्रमात या नव्या एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवून रवाना करण्यात आले. या कार्यक्रमाला केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि केंद्रीय वाणिज्य व उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे हजेरी लावली, तर प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या ठिकाणी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मत्स्योद्योग व बंदरेमंत्री नितेश राणे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर आणि महापौर रितू तावडे यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

**प्रवास होणार सुखकर**

सावंतवाडी आणि दक्षिण कोकणातील प्रवाशांना मुंबईला येण्या-जाण्यासाठी आता हक्काची आणि थेट गाडी उपलब्ध झाली आहे. ही ट्रेन नियमितपणे दररोज धावणार असल्याने ऐन सणासुदीच्या काळात प्रवाशांची होणारी धावपळ थांबणार आहे. आधुनिक सुविधांनी सज्ज असलेल्या या ट्रेनमुळे प्रवासाचा वेळ वाचेल आणि प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर होईल. गणपती उत्सवाच्या काळातच ही बहुप्रतिक्षित रेल्वेसेवा सुरू झाल्याने संपूर्ण कोकणात आनंदाचे वातावरण पसरले असून चाकरमान्यांनी सरकार आणि रेल्वे प्रशासनाचे आभार मानले आहेत.

# चांगल्या कल्पनांचे कृतीत रूपांतर करा

## राज्यपालांचे विद्यार्थ्यांना आवाहन; लोणेरे विद्यापीठात दीक्षांत समारंभ

**माणगाव : प्रतिनिधी, बातमीदार**

तीव्र स्पर्धा, मोठ्या संधी आणि आव्हानांनी भरलेल्या जगात विद्यार्थी आता प्रवेश करीत आहेत. राष्ट्राची प्रगती नवनिर्मिती आणि संशोधनावर अवलंबून आहे. एखादी नवीन कल्पना शोध असू शकते, मात्र त्या कल्पनेचा उत्पादक आणि समाजोपयोगी वापर करणे म्हणजे नवनिर्मिती होय. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील चांगल्या कल्पना केवळ विचार म्हणून न ठेवता त्यांचे कृतीत रूपांतर करावे, असे आवाहन राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांनी केले.

लोणेरे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या २८व्या दीक्षांत समारंभात राज्यपाल बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, रोजगार हमी योजनामंत्री तथा रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री भरत गोगावले, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, राज्यपालांचे सचिव डॉ.प्रशांत नारनवरे, विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.रजनीश कामत, कुलसचिव प्रा.अमित शेष, परीक्षा नियंत्रक डॉ.गीतांजली महामुणकर आदींची प्रमुख उपस्थिती होती.




पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून राज्यपाल जिष्णुदेव वर्मा म्हणाले की, भारताचा विकसित राष्ट्राचा प्रवास महानगरांपुरता मर्यादित राहणार नसून तो गावांमध्ये, लहान शहरांमध्ये आणि विद्यापीठांमध्येही घडणार आहे. त्यामुळे पदवीप्राप्त विद्यार्थ्यांनी केवळ नोकरीच्या संधी शोधणारे न बनता रोजगार निर्माण करणारे, नवनिर्मिती करणारे आणि समाजाच्या समस्या सोडविणारे अभियंते बनावे. शेती, पाणी, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण उपजीविकेतील प्रत्यक्ष समस्या सोडविण्यासाठी अभियांत्रिकी ज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी वापर करावा. (पान २ वर..)

### रिक्त पदे, सुविधांबाबत कार्यवाही करणार -मंत्री चंद्रकांत पाटील

यावेळी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, काही कारणांमुळे गेल्या दोन-तीन वर्षांत विद्यापीठातील परीक्षांचे निकाल जाहीर होण्यास विलंब झाला, मात्र रात्रंदिवस काम करून निकालांचा बॅकलॉग मोठ्या प्रमाणात दूर केला असून उर्वरित कामही लवकरच पूर्ण करण्यात येईल. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी यापुढे निकाल जाहीर झाल्यानंतर तत्काळ पदवी प्रमाणपत्र तयार होऊन ते 'डिजी लॉकर'मध्ये उपलब्ध होईल. विद्यापीठातील प्राध्यापकांसह रिक्त पदे पुढील तीन महिन्यांत भरण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल तसेच प्रलंबित निधी, कंपाऊंडसह आवश्यक पायाभूत सुविधा आणि अन्य प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी शासनस्तरावर कार्यवाही करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

## विद्यानंद बापट यांच्यावर हल्ला; आरोपी ताब्यात



**पुणे : प्रतिनिधी**

सार्वजनिक ठिकाणी डीजे आणि लाऊडस्पीकरच्या अमर्याद वापराविरोधात भूमिका मांडणारे पुण्यातील विद्यानंद बापट यांच्यावर गुरुवारी (दि.३) टिळक रोड परिसरात एका व्यक्तीने हल्ला केला. याप्रकरणी गुन्हे शाखेने आरोपी संतोष चव्हाण याला ताब्यात घेतले आहे.

बापट गुरुवारी एका वृत्तवाहिनीशी संवाद साधत होते. त्यावेळी संतोष चव्हाणने तेथे येत बापट यांच्याशी हुज्जत घातली आणि चापट मारली. सध्या पुणे पोलीस आणि गुन्हे शाखा आरोपी चव्हाणची सखोल चौकशी करत असून पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

दरम्यान, या घटनेवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. "अशा पद्धतीने मारहाण करणे योग्य नाही. शेवटी प्रत्येकाला आपले मत मांडण्याचा अधिकार आहे. पुण्यासारख्या ठिकाणी असे वाद योग्य वाटत नाहीत. आपला गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीकडे नेला पाहिजे. त्या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत," असे मुख्यमंत्री म्हणाले.

## 'शेल इंडिया मार्केट्स'च्या कामगारांना भरघोस वेतनवाढ

■ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत करार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेल एम्प्लॉईज युनियनच्या मार्गदर्शनाखाली शेल इंडिया मार्केट्स प्रा.लि. कंपनीतील कामगारांचा पुढील चार वर्षांसाठीचा ऐतिहासिक वेतन करार पार पडला. सल्लागार तथा आमदार प्रशांत ठाकूर आणि संघटनेचे अध्यक्ष जितेंद्र घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि.३) या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

या नवीन चार वर्षांच्या करारानुसार कामगारांच्या वेतनामध्ये व इतर सुविधांमध्ये मोठी वाढ झाली आहे. यात कामगारांना सरसकट २३



हजार ५०० रुपयांची वेतनवाढ देण्यात आली असून पाच लाख रुपयांचा मेडिकल इन्शुरन्स, वार्षिक वाढ अशा सर्व बाबी मिळून एकूण ३१,४०० रुपयांची भरीव वाढ मंजूर करण्यात आली आहे. या करारामुळे कंपनीतील कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

याआधी कंपनीने कामगारांच्या दिवाळी बोनससाठी एक लाख २५ हजार रुपयांचा करार संघटनेसोबत केला आहे.

या करारावेळी शेल इंडिया एम्प्लॉईज युनियन कामगार संघटनेचे सल्लागार आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष जितेंद्र घरत, रामदास गोंधळी, सुनील पाटील, यासिन शेख, जयराज जाधव, अनिल पावशे, सुनील हरिचंद्रकर तसेच कंपनी व्यवस्थापनाच्या वतीने गुलशन चौधरी, उत्पल कुमार, शशांक शेखर, ज्ञानेश्वर पाटील आदी उपस्थित होते.

## अलिबागमधील व्यावसायिकाच्या हत्येप्रकरणी दोन जणांना अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

काँग्रेसचे अलिबाग तालुकाध्यक्ष सुनील थळे यांचे धाकटे बंधू व व्यावसायिक विजय थळे यांचा बुधवारी सायंकाळी संशयास्पद मृत्यू झाला होता. ही हत्या असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असून याप्रकरणी पोलिसांनी दोन जणांना अटक केली आहे.

आबलू उर्फ निकेश चंद्रकांत दळवी आणि सोनू उर्फ आशिष चंद्रकांत दळवी अशी या आरोपींची नावे आहेत. त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले असता पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

प्राथमिक माहितीनुसार मापगाव परिसरातील टाकादेवी मंदिरानजीक असलेल्या दगडाच्या खाणीजवळ आबलू उर्फ निकेश दळवी आणि सोनू उर्फ आशिष दळवी यांची विजय थळे यांच्याशी बाचाबाची झाली. यावेळी आरोपींनी थळे यांना जेसीबीची धडक दिली. यात ते गंभीर जखमी झाले. त्यांना अलिबाग येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

घटनेनंतर संशयित आरोपी पळून जात होते. पोलिसांनी त्यांना अटक केली. या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे.

## निवडक

### सीजेपीत फूट, सहकाऱ्याकडून अभिजित दीपकेंवर आरोप

**अहमदाबाद :** कॉक्रोच जनता पक्षात (सीजेपी) फूट पडली असून दिल्लीच्या जंतरमंतरवर झालेल्या आंदोलनात महत्त्वाची भूमिका बजावलेल्या अहमदाबाद येथील मनीष ब्रह्मभट्ट नावाच्या युवकाने गुरुवारी (दि.३) नव्या कॉक्रोच जनता पक्ष डेमोक्रेटिक स्थापनेची घोषणा केली. "अभिजित दीपके यांनी घरबसल्या १२ लोकांची टीम तयार केली. यासाठी कोणत्याही मूळ कार्यकर्त्याला किंवा आंदोलनाशी जोडलेल्या लोकांना बोलावण्यात आले नाही. त्यांनी आम आदमी पक्षाशी जोडलेल्या आठ लोकांना, स्वतःच्या मैत्रिणींना आणि कॉलेजच्या मित्रांना यात जोडले," असा आरोपही मनीष यांनी केला.

### माजी कबड्डी कर्णधार तारक राऊळ यांचे निधन

**मुंबई :** भारतीय कबड्डी संघाचे माजी कर्णधार शिवछत्रपती पुरस्कार विजेते खेळाडू तारक राऊळ यांचे गुरुवारी (दि. ३) पहाटे निधन झाले. ते ७५ वर्षांचे होते. गेले काही दिवस ते आजाराशी सामना करीत होते. त्यांच्यावर दादर येथील चैत्यभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## अभिनंदन अन शुभेच्छा!



**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी महाविद्यालयात एसवायबीकॉममध्ये शिकणारा आदित्य अमोल खंडिझोड याने काठमांडू येथे पार पडलेल्या सातव्या आशियाई साव्हाते चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक पटकावले. या कामगिरीच्या जोरावर आदित्यची आता ९ ते १३ सप्टेंबरदरम्यान पॅरिस येथे होणाऱ्या प्रतिष्ठेच्या वर्ल्ड साव्हाते चॅम्पियनशिपसाठी भारतीय संघात निवड झाली आहे. याबद्दल संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अदित्यचे अभिनंदन करून जागतिक स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के. पाटील, फिजिकल डायरेक्टर डॉ.व्ही.बी. नाईक आदी उपस्थित होते.**




# महिलांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

## खोपोलीत मंगळागौर स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद




**खालापूर : रामप्रहर वृत्त**

पारंपरिक वेशभूषा आणि मंगळागौरीच्या खेळांनी खोपोलीतील महाराजा मंगल कार्यालयात महिलांचा जल्लोष पाहायला मिळाला. विक्रम साबळे फाउंडेशनच्या वतीने सलग तिसऱ्या वर्षी आयोजित मंगळागौर पारंपरिक लोकनृत्य स्पर्धा बुधवारी मोठ्या उत्साहात पार पडली.

भाजप नेते यशवंत साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली, तर उपनगराध्यक्ष विक्रम साबळे आणि माजी नगरसेवक अविनाश तावडे यांच्या नेतृत्वाखाली हा भव्य सांस्कृतिक सोहळा रंगला. स्पर्धेचे खास आकर्षण ठरल्या अभिनेत्री ऋतुजा बागवे. त्यांनी महिलांसोबत मनसोक्त गप्पा मारत फुगडी खेळली आणि कार्यक्रमाची रंगत आणखी वाढवली.

सहा गटांमधील स्पर्धेत परीक्षक मीनाक्षी पटवर्धन आणि माधुरी आठवले यांनी विजेत्यांची निवड केली. यामध्ये आई गावदेवी चामुंडा ग्रुप शेडवलीने प्रथम क्रमांक, सखी मंगळागौर ग्रुप कांबेने द्वितीय क्रमांक, तर गोडवा संस्कृती पथक आवळाने तृतीय क्रमांक पटकावला. (पान २ वर..)

# माणगाव बायपाससह मुंबई-गोवा महामार्ग जानेवारीपर्यंत पूर्ण होणार

## मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचा विश्वास; ताम्हिणीमार्गे येणाऱ्या वाहनांना कोकणात जाण्यासाठी माणगाव बायपास वापरता येणार

**महाड : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी गौरी गणपती सणाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा महामार्गाची पाहणी करून महाड येथे आढावा बैठक घेतली. या आढावा बैठकीत दरम्यान नागोठणे येथील उड्डाणपूल छोट्या वाहनांसाठी खुला होणार असून माणगाव व इंदापूर दोन्ही बायपास मिळून मुंबई गोवा महामार्गाचे जानेवारी २०२७ पर्यंत शंभर टक्के काम पूर्ण होईल असे आश्वासन त्यांनी यावेळी दिले.

गेली १४ वर्षापासून मुंबई गोवा महामार्गाचे काम सुरू आहे. मात्र भाजप सरकारच्या काळात खऱ्या अर्थाने या कामाला गती मिळाली असून जवळपास ९५ टक्के काम पूर्ण झाले आहे. चिपळूण येथील उड्डाणपूल व माणगाव इंदापूर या दोन ठिकाणचे बायपास वगळता संपूर्ण महामार्गाचे काम पूर्ण झाल्याचा आढावा यावेळी घेण्यात आला.

दरम्यान गौरी गणपतीच्या सणाला मोठ्या संख्येने चाकरमानी कोकणात येत असतात. त्यांना कोणत्याही प्रकारचा अडथळा अथवा त्रास होऊ नये, तसेच



गौरी गणपतीचा हा सण आनंदाने उत्साहाने साजरा व्हावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी संपूर्ण महामार्गाची पाहणी करून, महाड येथे आढावा बैठक घेतली.

या बैठकीदरम्यान नागोठणे येथील उड्डाणपूल काही काळासाठी लहान वाहनांसाठी सुरू करणार असल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले मात्र या दरम्यान अवजड वाहतूक या पुलावरून होणार नाही असे देखील त्यांनी सांगितले. दरम्यान इंदापूर व माणगाव बायपासचे जवळपास काम पूर्ण झाले असले तरी रेल्वे उड्डाणपूल होऊ शकत नसल्याने सध्या तरी हा बायपास वाहतुकीसाठी वापरता येणार नाही. मात्र जानेवारी २०२७ पर्यंत हे दोन्ही बायपास पूर्ण होणार असल्याचे शिवेंद्रराजे भोसले यांनी सांगितले.

तसेच पुण्यावरून ताम्हिणी मार्गे येणाऱ्या वाहनांना कोकणात जाण्यासाठी माणगाव येथील बायपास वापरता येणार आहे. तसेच मुंबई गोवा महामार्गाचे शंभर टक्के काम पूर्ण होत नाही तोपर्यंत टोल वसुली करू नका अशी जनतेची मागणी यावेळी मंत्री अदिती तटकरे व पालकमंत्री भरत गोगावले या दोन्ही मंत्र्यांनी मांडली. दरम्यान पालकमंत्री भरत गोगावले यांनी थेट केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांना फोन लावून परिस्थितीची जाणीव करून दिली. दरम्यान नितीन गडकरी यांनी शिवेंद्रराजे भोसले यांच्याशी बोलताना आपण तसा प्रस्ताव द्यावा, सदर टोल काही काळासाठी बंद करण्याच्या आश्वासन दिले. त्यामुळे मुंबई गोवा महामार्गावरील खारपाडा येथील टोल सध्या तरी बंद होणार असल्याचे यावेळी दिसून येत आहे.

दरम्यान महामार्गा लगत झालेले अतिक्रमण व हातगाड्या यामुळे होणारी वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस विभागाला व स्थानिक प्रशासनाला देखील सूचना देण्यात आल्या आहेत. या आढावा बैठकीला सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह पालकमंत्री भरत गोगावले, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषद सदस्य विकास गोगावले, भाजपाचे महेश शिंदे, सुमित पवार, राष्ट्रवादी च्या स्नेहल जगताप, धनंजय देशमुख यांच्यासह जिल्हाधिकारी किसन जावळे पोलीस अधीक्षक आंचल दलाल व संबंधित विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

# कामोठ्यातील 'एल.के. विवांता'च्या चार अनधिकृत मजल्यांवर पालिकेची तोडक कारवाई

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती 'क' अंतर्गत कामोठे सेक्टर २२ येथील भूखंड क्रमांक ७३ व ७४ वर उभारण्यात आलेल्या 'एल. के. विवांता' इमारतीमधील विनापरवानगी बांधण्यात आलेल्या अनधिकृत चार मजल्यावर पालिकेमार्फत कारवाई करण्यात आली. तोडक कारवाई करण्याबाबत महापौर नितीन पाटील यांनी सूचना दिल्या होत्या. त्यानंतर महानगरपालिका आयुक्त मंगेश चितळे यांनी संबंधित विभागास आदेश दिले. त्यानुसार आज तात्काळ तोडक कारवाई करण्यात आली.

सदर इमारतीच्या बांधकामास मंजुरी असलेल्या ११ मजल्यांच्या आराखड्याच्या व्यतिरिक्त १२ वा, १३ वा, १४ वा आणि १५ असे चार मजले विनापरवानगी बांधण्यात आल्याचे महानगरपालिकेच्या निदर्शनास आले होते. या अनधिकृत बांधकामासंदर्भात महानगरपालिकेने यापूर्वी संबंधित बांधकामधारकास नोटिसा बजावल्या होत्या. तसेच बांधकाम तत्काळ थांबविण्याबाबत सूचना करण्यात आल्या होत्या, परंतू सदर नोटीसांना न जुमानता



## ८० अनधिकृत सदनिका तोडल्या

सदरचे बांधकाम सुरू ठेवले होते. संबंधित प्रकरणी सुनावणी घेऊन अनधिकृत बांधकाम स्वतःहून निष्कासित करण्याचे आदेश ही देण्यात आले होते.

पनवेल महानगरपालिकेने दिनांक २० ऑगस्ट २०२६ रोजी बजाविलेल्या नोटीसीद्वारे संबंधितांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ मधील तरतुदींनुसार महानगरपालिकेमार्फत तोडक/निष्कासनाची कारवाई करण्यात येईल आणि त्यासाठीचा खर्च संबंधित अनधिकृत बांधकामधारकाकडून वसूल करण्यात येईल, असे स्पष्ट करण्यात आले होते. सदर इमारतीमध्ये ए आणि बी अशा दोन विंग असून, प्रत्येक विंगमध्ये १२ ते १५ या चारही अनधिकृत मजल्यांवर प्रत्येकी १० सदनिका आहेत. त्यानुसार एका मजल्यावर एकूण २० सदनिका असून, चार अनधिकृत मजल्यांमध्ये एकूण ८० सदनिकांचे बांधकाम करण्यात आले आहे.

याबाबत संबधित कंपनीने उच्च न्यायालयात स्थगिती देण्याची मागणी केली होती. परंतू उच्च न्यायालयाने याबाबत कोणतीही स्थगिती दिलेली नाही. आजची तोडक कारवाई पनवेल महानगरपालिका अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त रविकिरण घोडके, सहायक आयुक्त डॉ. रुपाली माने, अनधिकृत बांधकाम विभागाचे प्रमुख अमर पाटील तसेच पोलीस प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आली.

# नवी मुंबई प्रकल्पबाधित विद्यार्थ्यांनी विद्यावेतन अर्ज ३० नोव्हेंबरपर्यंत सादर करण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल आणि उरण तालुक्यांतील नवी मुंबई प्रकल्पबाधितांच्या पाल्यांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता विद्यावेतनाचे अर्ज करण्यासाठी अंतिम मुदत ३० नोव्हेंबर २०२६ असून सिडकोच्या पुनर्वसन विभागाच्या कार्यालयामध्ये दि. ०१ सप्टेंबर २०२६ पासून विद्यावेतन अर्जांचे वाटप करण्यास सुरूवात झाली आहे.

नवी मुंबई प्रकल्पाकरिता पनवेल आणि उरण तालुक्यांतील ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यातआल्या होत्या अशा प्रकल्पबाधितांच्या पाल्यांना महविद्यालयीन शिक्षणाकरिता सिडको महामंडळाच्याधोरणात्मक निर्णयानुसार विद्यावेतन देण्यात येते. सिडकोच्या पुनर्वसन विभागामार्फत प्रकल्पग्रस्त कुटुंबातीलविद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस प्रोत्साहन देण्यासाठी विद्यावेतन योजना राबविण्यात येत आहे. प्रचलितधोरणानुसार मूळ प्रकल्पग्रस्तांच्या तिसऱ्या पिढीपर्यंतच या योजनेचा लाभ घेता येईल. तसेच प्रकल्पग्रस्तांच्या विवाहित मुलींच्या पाल्यांना या योजनेचा लाभ घेता येणार नाही.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता विद्यावेतन योजनेचे अर्ज दि. ०१ सप्टेंबर २०२६ ते दि. ३० नोव्हेंबर २०२६ याकालावधीत पात्र विद्यार्थ्यांना पुनर्वसन विभाग, टॉवर क्र. ७, ७ वा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, नवीमुंबई येथे वितरित करण्यात येणार आहेत. विद्यावेतनाचा पूर्ण भरलेला अर्ज विद्यार्थ्यांनी सदर कार्यालयामध्येविहित मुदतीमध्ये सादर करावा. विद्यावेतनासाठी नव्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी साक्षांकित केलेलीभूसंपादन निवाडा प्रत, सी.सी. फॉर्म, ७/१२ उतारा, ताबा पावती, मागील वर्षीची गुणपत्रिका, चालूवर्षाकरिता भरलेल्या प्रवेश फी ची प्रत, पासपोर्ट आकाराच फोटो, बँक पासबुक, आधार कार्ड इ. आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत जोडावीत. मागील वर्षी विद्यावेतानाचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांनी मागील वर्षीच्या साक्षांकित केलेल्या गुणपत्रिका, चालू वर्षाकरिता भरलेल्या प्रवेश फी ची प्रत, महाविद्यालयीन ओळखपत्र,पासपोर्ट आकाराचा फोटो, आधार कार्ड, बँक पासबुकची झेरॉक्स प्रत इ. आवश्यक कागदपत्रे अर्जासोबतजोडावी. विहित मुदतीत अर्ज सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना अर्ज सादर केल्याची पोहोच पावती देण्यात येईल.

सन २०२५-२६ ते २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता १०% वाढीव प्रमाणे विविध अभ्यासक्रमांकरिताविद्यावेतनाची रक्कम पुढील प्रमाणे असणार आहे : आयटीआय रु. ७,९७२/-, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय(११ वी ते १५ वी पर्यंत) - रु. १३,२८६/-, पदव्युत्तर - रु. १५,९४५/- .विहित मुदतीनंतर, म्हणजे दि. ३० नोव्हेंबर २०२६ नंतर प्राप्त होणाऱ्या विद्यावेतन अर्जांचा विचार करण्यात येणार नाही.



**पुणे : पनवेल येथील जितेंद्र अनंत म्हात्रे यांना सांगितीक, सामाजिक आणि सांस्कृतिक आदर्श महाराष्ट्र गौरव पुरस्कार देऊन राष्ट्रभक्ती परिवार, पुणे यांनी गौरविले.**

## मिशन युथ : व्यसनमुक्त नवी मुंबई अभियान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'ड्रग्ज फ्री इंडिया' या स्वप्नाला साकार करण्यासाठी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली बेलापूर विधानसभेच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या विशेष पुढाकाराने आयोजित 'मिशन युथः व्यसनमुक्त नवी मुंबई' या जनजागृती मोहिमेचा भव्य कार्यक्रम आज वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटर येथे अतिशय उत्साहात पार पडला.या उपक्रमाला नवी मुंबईतील हजारो तरुण-तरुणी, विद्यार्थी, पालक आणि विविध क्षेत्रांतील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

अमली पदार्थांच्या भयंकर विळख्यातून युवा पिढीला वाचवण्यासाठी आणि नवी मुंबईला पूर्णपणे 'ड्रग्ज फ्री' करण्यासाठी आमदार मंदा म्हात्रे यांनी या कार्यक्रमात उपस्थित तरुणांशी थेट संवाद साधला. व्यसनाधीनतेचे घातक परिणाम, त्यातून उद्भवणारे शारीरिक व सामाजिक धोके यांवर प्रकाश टाकत त्यांनी तरुणांना सशक्त, निरोगी आणि प्रगतीशील आयुष्याची नवी दिशा दाखवली.

या प्रसंगी उपस्थितांना संबोधित करताना आमदार . मंदा म्हात्रे म्हणाल्या, "नवी मुंबईतील प्रत्येक घर व्यसनमुक्त राहावे आणि आपल्या तरुणांचे भवितव्य सुरक्षित व्हावे, हेच माझे मुख्य ध्येय आहे. अमली पदार्थांच्या अंधारातून बाहेर पडून तरुणांनी आपल्या कौशल्याच्या आणि शिक्षणाच्या जोरावर उज्ज्वल भविष्य घडवले पाहिजे.

# उरण येथे शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद

**उरण : रामप्रहर वृत्त**

विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, जिज्ञासा, वैज्ञानिक दृष्टिकोन आणिनाविन्यपूर्ण विचारसरणी विकसित करण्यासाठी शिक्षकांनी अध्यापन पद्धतीत काळानुरूप बदल करणेआवश्यक आहे. याच उद्देशाने अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशन, पंचायत समिती उरण, Socit GnraleSecurities Services आणि भागुबाई चांगु ठाकूर विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने द्रोणागिरी, उरणयेथील भागुबाई चांगु ठाकूर विद्यालयात एकदिवसीय शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

या कार्यशाळेला उरण परिसरातील ५० हून अधिक शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभागनोंदविला.कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी पंचायत समिती उरणच्या वरिष्ठ विस्तार अधिकारी अरुणादेवी मोरे, JBSP संस्थेचे स्टेट एज्युकेशन इन्स्पेक्टर संतोष चव्हाण, भागुबाई चांगु ठाकूरविद्यालयाच्या मुख्याध्यापिका अनुराधा काठे तसेच अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशनचे महाराष्ट्र प्रोग्राम एक्झिक्युटिव्ह रोहन म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेदरम्यान Creativity, Creative Thinking, Curiosity आणि Innovation या चार महत्त्वपूर्णघटकांवर विशेष भर देण्यात आला. केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्या ऐवजीत्यांच्या मनात प्रश्न निर्माण करणे, निरीक्षणाची सवय लावणे, स्वतः विचार करून निष्कर्षापर्यंतपोहोचण्याची संधी देणे आणि विविध प्रयोगांच्या माध्यमातून ज्ञान आत्मसात करण्यास प्रवृत्त करणे, याआधुनिक अध्यापन पद्धतींचे महत्त्व शिक्षकांना समजावून सांगण्यात आले. प्रशिक्षणामध्ये शिक्षकांसाठीविविध कृतीशील व प्रात्यक्षिकाधारित उपक्रम घेण्यात आले. Low-Cost Science Models, Activity-BasedLearning आणि Model Making यांच्या माध्यमातून उपलब्ध व सहज मिळणाऱ्या साहित्याचा वापर करूनविज्ञान आणि गणितातील संकल्पना विद्यार्थ्यांना सोप्या व मनोरंजक पद्धतीने कशा समजावून देतायेतील, याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. तसेच Agastya Virtual School या माध्यमाचा शैक्षणिकप्रक्रियेत प्रभावी वापर कसा करता येईल, याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

विज्ञान व गणिताबरोबरच इतर विषयांच्या अध्यापनातही कृती, प्रयोग, प्रश्नोत्तर, निरीक्षण आणिसर्जनशील विचारांचा समावेश करून विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग कसा वाढविता येईल, याबाबतशिक्षकांनी विविध उपक्रमांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घेतला. त्यामुळे कार्यशाळेचे वातावरण अत्यंत उत्साहीआणि संवादात्मक झाले होते.या कार्यशाळेत अगस्त्य इंटरनॅशनल फाउंडेशनचे समन्वयक रोहन म्हात्रे,निशा धोंडे, प्रणिता म्हात्रे आणि मुक्ता गुडेकर यांनी शिक्षकांना मार्गदर्शन केले.

प्रशिक्षणादरम्यान शिक्षकांनी विविध कृतींमध्ये सहभागी होत आपल्या अध्यापनातील अनुभवांचीदेवाणघेवाण केली तसेच नाविन्यपूर्ण अध्यापन पद्धतींबाबत माहिती जाणून घेतली.आजच्या बदलत्या शैक्षणिक वातावरणात शिक्षकांची भूमिका केवळ ज्ञान देणाऱ्या व्यक्तीपुरतीमर्यादित न राहता विद्यार्थ्यांमध्ये विचार करण्याची, प्रश्न विचारण्याची, प्रयोग करण्याची आणि नव्याकल्पना मांडण्याची क्षमता विकसित करणाऱ्या मार्गदर्शकाची झाली आहे. या दृष्टिकोनातून आयोजितकरण्यात आलेली ही कार्यशाळा शिक्षकांसाठी अत्यंत उपयुक्त आणि मार्गदर्शक ठरली.आधुनिक शिक्षणअधिक सर्जनशील, कृतीशील, अनुभवाधारित आणि विद्यार्थीकेंद्रित करण्यासाठी अशा प्रशिक्षण कार्यशाळांचेसातत्याने आयोजन होणे आवश्यक असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. शिक्षकांच्या उत्स्फूर्तसहभागामुळे कार्यशाळेला विशेष यश मिळाले.

**पान १ वरुन**

## चांगल्या कल्पनांचे कृतीत रूपांतर करा

आजच्या भारताने डिजिटल इंडिया, स्किल इंडिया, स्टार्ट-अप इंडिया, मेक इन इंडिया आणि आत्मनिर्भर भारताच्या माध्यमातून युवकांना आपल्या कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी सक्षम परिसंस्था निर्माण केली आहे. या संधींचा विद्यार्थ्यांनी उपयोग करावा. आत्मविश्वासाने आव्हानांचा सामना करावा आणि प्रश्न विचारण्यास कधीही घाबरू नये, असे राज्यपालांनी सूचित केले.

लोणेरे हे किल्ले रायगड आणि महाड या ऐतिहासिक स्थळांच्या दरम्यान वसलेले असून छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक रायगडावर झाला, तर महाड येथील चवदार तळ्यावर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समतेच्या लढ्याला प्रारंभ केला. अशा ऐतिहासिक भूमीत डॉ. आंबेडकरांचे नाव विद्यापीठाला लाभले आहे, ही अभिमानाची बाब असल्याचे राज्यपालांनी सांगितले. विद्यापीठ परिसरात डॉ. आंबेडकरांचा पुतळा उभारण्यात आला असून लवकरच छत्रपती शिवाजी महाराजांचाही पुतळा उभारला जाणार आहे. हे दोन्ही पुतळे धैर्य आणि न्यायाची प्रेरणा देत विद्यार्थ्यांना समाजासाठी मोठे योगदान देण्याची आठवण करून देतील, असे त्यांनी नमूद केले.

पदवी ही केवळ विद्यार्थ्यांनी काय शिकले याचे प्रमाणपत्र नसून भविष्यात समाजाला काय योगदान देणार आहेत याची जबाबदारी आहे. ग्रामीण महाराष्ट्रातून आलेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या परिसरातील प्रत्यक्ष समस्या ओळखून त्यावर तंत्रज्ञानाधारित उपाय शोधावेत. जागतिक पातळीवर विचार करताना आपल्या समाजाच्या गरजा कधीही विसरू नयेत. विकसित भारत २०४७ साकारण्यात अभियंत्यांची भूमिका महत्त्वाची आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या गावाशी, शहराशी आणि ज्या समाजाच्या आकांक्षा घेऊन ते पुढे आले आहेत, त्या समाजाशी नाते कायम ठेवावे, असे आवाहन राज्यपालांनी केले.

यावेळी राज्यपालांनी विद्यार्थ्यांना नशामुक्त भारतासाठी कार्य करण्यास प्रेरित केले. अमली पदार्थांच्या व्यसनातून मित्र आणि सभोवतालच्या व्यक्तींना बाहेर काढण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न करावेत. युवकांची ऊर्जा सकारात्मक दिशेने वळवून समाज आणि राष्ट्राच्या विकासासाठी तिचा उपयोग करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

यावेळी उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी, विद्यापीठातील इनक्युबेशन सेंटरला चालना देऊन विद्यार्थ्यांच्या स्टार्टअप्सना सीड कॅपिटल उपलब्ध करून देण्यात येईल. एकल मातांच्या मुला-मुलींना शिक्षणासाठी विशेष पॅकेज देण्याचा प्रयत्न सुरू असून व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये मुलींचा सहभाग वाढविण्यावरही भर दिला जाईल, असे सांगून कृत्रिम बुद्धिमत्ता विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी विद्यापीठाची निवड झाली असून ३५ देशांचे प्रतिनिधी परिषदेला उपस्थित राहणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

पालकमंत्री भरत गोगावले यांनी विद्यापीठासाठी जमीन दिलेल्या प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या प्रलंबित नोकरीच्या प्रश्नावर सकारात्मक निर्णय घेऊन त्यांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली तसेच विद्यापीठाच्या परिसराला संरक्षक भिंत उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली.

महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दीक्षांत समारंभ हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा आणि सुवर्णक्षण असल्याचे सांगत डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या विकासासाठी उपलब्ध ८०० एकरांहून अधिक जागेचा आणि सुविधांचा अधिकाधिक उपयोग करावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. विद्यापीठातील विद्यार्थ्यांना यापुढे निकाल व पदवी मिळण्यासाठी विलंब होऊ नये यासाठी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी पुढाकार घेऊन बैठका घेतल्याबद्दल त्यांचे ना. तटकरे यांनी विशेष आभार मानले तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागातील शिक्षक व कर्मचाऱ्यांसाठी संयुक्त प्रशिक्षण केंद्र या परिसरात उभारण्याचा प्रस्ताव असून त्या दृष्टीने पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले.

कुलगुरू प्रा. राजनिश कामत यांनी विद्यापीठाच्या शैक्षणिक वाटचालीचा आढावा घेतला. तंत्रज्ञान व अभियांत्रिकी शिक्षणासोबत संशोधन, नवोपक्रम आणि उद्योगाभिमुख कौशल्यविकासाला विद्यापीठाच्या माध्यमातून प्राधान्य देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

दीक्षांत समारंभात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि ज्येष्ठ संगणक शास्त्रज्ञ तथा शिक्षणतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांना डॉक्टर ऑफ सायन्स ही मानद पदवी देण्यात आल्याची घोषणा करण्यात आली.

कार्यक्रमास विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य, विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी, पालक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## महिलांच्या कलागुणांना मिळाले व्यासपीठ

विजेत्यांना रोख पारितोषिके, पैठणी, सोन्याच्या नथी, सन्मानचिन्हांसह आकर्षक बक्षिसांनी गौरविण्यात आले. विविध बक्षिसांसाठी द्वारकादास शामकुमार सारी शॉप, इंद्रायणी साडी सेंटर, आर.टी. झवेरी ज्वेलर्स, मनिष ज्वेलर्स आणि अक्षय जखोटीया यांचे सहकार्य लाभले.

यावेळी नगरसेविका सानिया शेख, अश्विनी अत्रे, प्रतीक्षा रेटरेकर, सामाजिक कार्यकर्त्या गीता तावडे, ज्योती पाटील, सायली मसुरकर, अर्चना मोरे यांच्यासह भाजप खोपोली मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. या उपक्रमाने खोपोलीत पुन्हा एकदा महिलांच्या कलागुणांचा जल्लोष अनुभवायला मिळाला.

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर सभापतींचे पाहणी दौरे

## सुविधा-सुरक्षेवर भर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी गणेशोत्सव उत्साहात, सुरक्षित आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘ड’ चे सभापती अजय बहिरा आणि प्रभाग समिती ‘क’ चे सभापती रवी जोशी यांनी आपापल्या प्रभागात विशेष पाहणी दौरा केला. आगमन-विसर्जन मार्ग, विसर्जन घाट, विद्युत व्यवस्था, स्वच्छता आणि वाहतूक नियोजनाचा त्यांनी आढावा घेत अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिल्या.

आगामी गणेशोत्सव अत्यंत उत्साहात, सुरक्षिततेत आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडावा यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘ड’चे सभापती अजय बहिरा यांनी विशेष पाहणी दौऱ्याचे आयोजन केले होते. उत्सव काळात नागरिकांना तसेच भाविकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, मुख्य रस्त्यांवर वाहतूक कोंडी होऊ नये आणि विसर्जन स्थळांवर गर्दीचे योग्य नियोजन व्हावे यासाठी त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन विविध सोयीसुविधांची बारकाईने पाहणी केली.

या दौऱ्यादरम्यान सभापती अजय बहिरा यांनी प्रभाग समिती ‘ड’अंतर्गत येणारे प्रमुख रस्ते, गणेशमूर्ती आगमन व विसर्जन मार्ग, विसर्जन घाट तसेच विद्युत व्यवस्था आणि स्वच्छतेचा सविस्तर आढावा घेतला. शहरातील मुख्य बाजारपेठा आणि विसर्जन मार्गांवर होणारी संभाव्य गर्दी लक्षात घेता वाहतूक पोलिसांनी महापालिकेच्या समन्वयाने चोख नियोजन करावे, रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवून आगमन व विसर्जन मार्ग निर्विघ्न करावेत, अशा सूचना त्यांनी दिल्या. यावेळी नगरसेवक सुमित झुंजारराव, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, भाजप शहर उपाध्यक्ष केदार भगत, सरचिटणीस रुपेश नागवेकर, महेश मेटकर, जॉनी जॉर्ज यांच्यासह पनवेल महानगरपालिकेचे संबंधित अधिकारी, कर्मचारी आणि स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग समिती ‘क’चे सभापती रवी जोशी यांनी प्रभाग क्रमांक ९ आणि १५मध्ये विशेष पाहणी दौरा आयोजित केला होता. उत्सव काळात नागरिकांना मूलभूत सुविधा सुरळीत मिळाव्यात या दृष्टीने त्यांनी प्रत्यक्ष विविध स्थळांची पाहणी करून प्रशासकीय अधिकाऱ्यांना आवश्यक त्या महत्त्वपूर्ण सूचना दिल्या.

या पाहणी दौऱ्यादरम्यान सभापती रवी जोशी यांनी खांदा कॉलनी, टेंभुर्डे, वळवली, खिडूकपाडा या परिसरांसह प्रभागातील विविध रस्ते, श्रीगणेशमूर्ती आगमन व विसर्जन मार्ग, विसर्जन घाट आणि तेथील सोयीसुविधांची पाहणी करून आवश्यक त्या सूचना दिल्या. यावेळी नगरसेवक एकनाथ गायकवाड, काका शेळके, दशरथ म्हात्रे, महादेव मधे, दिलीप पाटील, नगरसेविका प्रतिभा भोईर, दमयंती भोईर, युवा नेते निलेश भोईर, सचिन चौधरी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी उपस्थित होते.



# गणेशोत्सव मंडळांना पोलिसांच्या कडक सूचना

## डीजे-डॉल्बी आणि लेझरला बंदी



**पनवेल : वार्ताहर**

आगामी गणेशोत्सव २०२६च्या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना पोलिसांनी कडक सूचना दिल्या असून डीजे, डॉल्बी सिस्टीम आणि लेझर लाईटच्या वापरावर बंदी घालण्यात आली आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक मंथन हॉल, तालुका पोलीस ठाण्याजवळ, पनवेल येथे घेण्यात आली. पोलीस उपायुक्त परिमंडळ-३, पनवेल रश्मी नांदेडकर आणि सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल विभाग मयूर भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत गणेशोत्सव शांततेत व सुरक्षित वातावरणात पार पाडण्यासाठी मंडळांना विविध सूचना देण्यात आल्या. बैठकीला पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांच्यासह सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांचे सुमारे ४५ ते ५० पदाधिकारी उपस्थित होते.

गणेशोत्सव मंडळांनी मंडप उभारण्यापूर्वी संबंधित महानगरपालिका, सिडको, अग्निशमन विभाग, महावितरण तसेच वाहतूक शाखेकडून आवश्यक परवानग्या घेणे बंधनकारक असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. राज्य शासनाने मंडप उभारणीसंदर्भात निश्चित केलेल्या अटी-शर्तींचे काटेकोर पालन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. मंडप व स्टेजची उभारणी करताना ऊन, वारा, पाऊस तसेच भटक्या जनावरांपासून गणेशमूर्तीला कोणताही धोका निर्माण होणार नाही, याची दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले. गणेशमूर्तीची स्थापना झाल्यानंतर दिवस-रात्र स्वयंसेवकांची नियुक्ती करावी तसेच मंडप परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत, असेही सांगण्यात आले.

ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या नियमांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले. कोणत्याही गणेशोत्सव मंडळाने डीजे, डॉल्बी सिस्टीम किंवा लेझर लाईटचा वापर करू नये, अशी स्पष्ट सूचना पोलिसांनी केली. तसेच कोणतेही आक्षेपार्ह देखावे, फलक अथवा मजकूर लावू नये. गणेशमूर्तीच्या दर्शनासाठी महिला आणि पुरुषांच्या स्वतंत्र रांगा ठेवून गर्दीचे योग्य नियोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.गणेशमूर्तीच्या आगमन व विसर्जन मिरवणुका शक्यतो रस्त्याच्या एका बाजूने काढाव्यात. मिरवणुकीदरम्यान गर्दी नियंत्रणासाठी शक्य असल्यास दोरीचा वापर करावा, असे पोलिसांनी सांगितले.

# कामोठे बसस्टॉपवर चोरट्यांचा सुळसुळाट

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे परिसरातील बसस्टॉपवर गर्दीचा फायदा घेत प्रवाशांच्या खिशातून मौल्यवान वस्तू लंपास करण्याच्या दोन घटना अवघ्या दोन दिवसांत घडल्या आहेत. बसमध्ये चढताना एका प्रवाशाची ४९ हजार रुपयांची रोकड, तर दुसऱ्या प्रवाशाचा सुमारे ३५ हजार रुपये किमतीचा आयफोन चोरीला गेला.

पहिल्या घटनेत संजय रामचंद्र जाधव (४२) यांनी कोपरखैरणे येथील सारस्वत बँकेतून ४९ हजार रुपये काढले होते. कामानिमित्त कळंबोलीतील भीमा कॉम्प्लेक्स येथे गेल्यानंतर ते तुर्भे येथे जाण्यासाठी निघाले. कळंबोली सर्कलमार्गे एमजीएम रुग्णालयासमोरील बसस्टॉपवर आल्यानंतर ते बस क्रमांक सी-५३ मध्ये चढत होते.बसच्या गर्दीत मागून दोन अनोळखी व्यक्ती चढत असताना जाधव यांच्या जीन्सच्या उजव्या खिशातून कोणीतरी वस्तू काढल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी खिशाची तपासणी केली असता ५०० रुपयांच्या ९८ नोटा असलेली ४९ हजार रुपयांची रोकड गायब असल्याचे आढळले. त्यांनी बस थांबवून कंडक्टरला माहिती दिली. संशयावरून एका व्यक्तीची बॅग तपासण्यात आली; मात्र त्यामध्ये रोकड सापडली नाही. त्यानंतर संशयितांचा शोध घेण्यात आला; मात्र ते मिळून आले नाहीत.

दुसरी घटना कळंबोली कॉलनी-कामोठे बसस्टॉप परिसरात घडली. आयटी कंपनीत कार्यरत असलेले विकास नारायण घोरपडे (३८) हे कामावर जाण्यासाठी बस क्रमांक २४ मध्ये चढत होते. त्यांनी ॲपल कंपनीचा आयफोन १३ पॅन्टच्या डाव्या खिशात ठेवला होता. बसमध्ये चढल्यानंतर काही वेळातच त्यांनी खिशाची तपासणी केली असता मोबाईल गायब असल्याचे निदर्शनास आले. घोरपडे यांनी बसमधील प्रवासी तसेच परिसरात चौकशी केली; मात्र मोबाईलचा ठावठिकाणा लागला नाही. चोरी झालेल्या आयफोनची किंमत सुमारे ३५ हजार रुपये असून, त्याचा आयएमईआय क्रमांक पोलिसांना देण्यात आला आहे.दोन्ही घटनांमध्ये प्रवासी बसमध्ये चढत असतानाच गर्दीचा फायदा घेत त्यांच्या खिशातील मौल्यवान वस्तू चोरीला गेल्याचे समोर आले आहे. त्यामुळे बसमध्ये चढताना प्रवाशांवर पाळत ठेवून चोरटे संधी साधत असल्याचा संशय आहे.

कामोठे पोलिसांकडून दोन्ही घटनांचा तपास करण्यात येत आहे. बसमध्ये चढताना प्रवाशांनी रोख रक्कम, मोबाईल, पाकीट आणि अन्य मौल्यवान वस्तू सुरक्षित ठेवाव्यात तसेच गर्दीच्या ठिकाणी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# उलवेतील सौ. शकुंतला ठाकूर स्कूलमध्ये सखी सावित्री समितीची सभा

**उलवे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे येथे सखी सावित्री समिती व कार्यस्थळी महिला तक्रार निवारण समितीची सभा उत्साहपूर्ण वातावरणात झाली. या सभेमध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनींचे आरोग्य, सुरक्षितता तसेच शाळेत उपलब्ध असलेल्या विविध सुविधांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी उपलब्ध असलेल्या सॅनिटरी पॅड व स्वच्छतागृह सुविधा, तक्रार पेटी याबाबत माहिती घेण्यात आली तसेच यापूर्वी आयोजित करण्यात आलेल्या किशोरवयीन मुला-मुलींसाठी मार्गदर्शन शिबिर



व आरोग्य तपासणी शिबिराचा आढावा घेण्यात आला. या उपक्रमांचा विद्यार्थ्यांना झालेला लाभ, त्यांच्या आरोग्यविषयक गरजा तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत चर्चा झाली. सभेला जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, पंचायत समितीच्या माजी सदस्य रत्नप्रभा घरत, स्थानिक डॉ. आरती चव्हाण व डॉ. निखत, पालक सभासद, विद्यार्थी प्रतिनिधी तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर उपस्थित होत्या.

# पनवेल पूर्व मंडळ उपाध्यक्षपदी सतीश मालुसरे; विचुंबे विभागीय अध्यक्षपदी प्रवीण म्हात्रे



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी पनवेल पूर्व मंडळ भाजपच्या उपाध्यक्षपदी माजी सरपंच सतीश मालुसरे यांची, तर विचुंबे पंचायत समिती विभागीय अध्यक्षपदी प्रवीण म्हात्रे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपचे महाराष्ट्र प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर तसेच भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या मार्गदर्शनाखाली या नियुक्त्या करण्यात आल्या.

यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पंचायत समिती उपसभापती भूपेंद्र पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, माजी सरपंच संतोष शेळके, गोमा खंडवी, माजी सरपंच नंदू भोपी, जयेश पाटील, नितीन मोरे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. नवनियुक्त सतीश मालुसरे आणि प्रवीण म्हात्रे यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# भाजप महिला मोर्चा उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी सीमा घरत





**उरण : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष महिला मोर्चाच्या उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्षपदी उरण येथील सीमा अनंत घरत यांची नियुक्ती झाली असून त्यांच्या नियुक्तीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांच्यासह पक्षातील ज्येष्ठ नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



भारतीय जनता पार्टीच्या संघटनात्मक विस्तारामध्ये महिला मोर्चाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना, महिला सक्षमीकरणाच्या उपक्रमांची माहिती तळागाळातील महिलांपर्यंत पोहचविण्यासोबतच महिलांच्या समस्या व प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडण्यासाठी महिला मोर्चाच्या माध्यमातून सातत्याने विविध उपक्रम राबविले जातात. या पार्श्वभूमीवर सीमा घरत यांच्यावर उत्तर रायगड जिल्ह्यातील महिला मोर्चाच्या संघटनात्मक कार्याची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

उरण परिसरात सामाजिक व संघटनात्मक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सीमा घरत यांना पक्षाने दिलेल्या या जबाबदारीमुळे महिला कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होण्यास मदत होणार आहे. पक्षाची विचारधारा आणि केंद्र व राज्य सरकारच्या विकासाभिमुख धोरणांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासोबतच महिलांना संघटनेशी जोडण्यासाठी त्या प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

महिलांच्या विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक तसेच रोजगार आणि स्वावलंबनाशी संबंधित प्रश्नांवर संघटनेच्या माध्यमातून आवाज उठविण्याबरोबरच महिला सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यावर भर देणार असल्याचे सीमा घरत यांनी सांगितले. पक्षाने सोपविलेली जबाबदारी प्रामाणिकपणे आणि सर्वांना सोबत घेऊन पार पाडण्याचा प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

सीमा घरत यांच्या नियुक्तीबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या तसेच ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत घरत, उरणचे उपनगराध्यक्ष रवी भोईर, उरण तालुका सचिव सुनील पाटील, महिला अध्यक्ष राणी म्हात्रे, सचिव शमिता ठाकूर, आर्चीत घरत, भगवान घरत, तालुका चिटणीस बळीराम घरत, जासई गाव अध्यक्ष सुनील घरत, दत्तात्रेय ठाकूर, उरण नगर परिषद, शिक्षण समिती सभापती जसिम गॅस, नगरसेविका सायली पाटेकर, नगरसेवक राजेश ठाकूर, उद्योजक राजेंद्र पडते, अनंत घरत, विशाल पाटेकर आदी मान्यवरांनीही त्यांचे अभिनंदन केले.

# पनवेल महापालिकेचा पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा जागर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या वतीने ‘माझी वसुंधरा अभियान ७.०’ अंतर्गत ‘उत्सव गणरायाचा, जागर पर्यावरणाचा’ हा उपक्रम महापालिका आणि आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत गुरुवारी (दि. ३) लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथे शाडू मातीच्या गणेशमूर्ती बनविण्याची पर्यावरणपूरक कार्यशाळा आयोजित करण्यात आली.



पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याच्या उद्देशाने नागरिकांमध्ये जनजागृती करण्याबरोबरच विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा यासाठी विविध ठिकाणी शाडू मातीच्या गणेशमूर्ती निर्मितीच्या कार्यशाळांचे आयोजन पनवेल महानगरपालिकेच्या पर्यावरण विभागाच्या वतीने करण्यात येत असल्याची माहिती उपायुक्त स्वरूप खारगे यांनी दिली. या कार्यशाळेदरम्यान विद्यार्थ्यांना पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचे महत्त्व, शाडू मातीच्या गणेशमूर्तींचे पर्यावरणीय फायदे तसेच गणेशोत्सवादरम्यान पर्यावरण संवर्धनाची आवश्यकता याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत शाडू मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचा अनुभव घेतला. यावेळी सहाय्यक आयुक्त बाळाराम रातांबे तसेच शाळेचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात वृक्षारोपण अभियान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) व डीएलएलई विभागाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या परिसरात ३१ ऑगस्ट रोजी वृक्षारोपण अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.



वृक्षारोपण अभियानात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक, डीएलएलईचे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. यावेळी विविध वृक्षांची लागवड करून त्यांचे संगोपन व संवर्धन करण्याचा संदेश देण्यात आला. वृक्षारोपण केवळ एकदिवसीय अभियान न राहता लावलेल्या वृक्षांची नियमित देखभाल करणे हीदेखील प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले. ‘वृक्ष लावा, वृक्ष जगवा आणि पर्यावरण वाचवा,’ या संदेशातून हिरवेगार, निरोगी आणि शाश्वत भविष्य घडविण्याचे आवाहन करण्यात आले.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्य डॉ. माहेश्वरी झिरपे यांचे मार्गदर्शन लाभले. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय सेवा योजना समितीचे सदस्य, डीएलएलईचे सदस्य आणि विद्यार्थी स्वयंसेवकांनी सक्रिय सहभाग घेतला. उपक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. महादेव चव्हाण व प्रा. महेश धायगुडे यांनी केले.

## संपादकीय

# नशामुक्तीचा निर्धार

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यसनमुक्तीला राष्ट्रीय चळवळीचे स्वरूप देण्याचा निर्धार केला आहे. पाठोपाठ महाराष्ट्रही सर्व विभागांना एकत्र आणून नशामुक्तीचे धोरण राबवणारे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

**केंद्र सरकारने २०२९ पर्यंत देशाला नशामुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली 'नशामुक्त भारत अभियान' अधिक व्यापक लोकसहभागाच्या दिशेने पुढे जात आहे. अमली पदार्थांविरुद्धची लढाई कोणत्याही एका विभागाची नसून संपूर्ण शासनव्यवस्था आणि समाजाची ती सामूहिक जबाबदारी आहे, हा या धोरणामागचा मूलभूत विचार आहे. अमली पदार्थांचे वाढते जाळे ही आता केवळ कायदा-सुव्यवस्थेची समस्या राहिलेली नाही. तरुण पिढीचे भविष्य, सामाजिक स्वास्थ्य, आर्थिक सुरक्षितता आणि देशाच्या अंतर्गत सुरक्षेला आव्हान देणाऱ्या या संकटाविरुद्ध आता निर्णायक लढाईची वेळ आली आहे. या समस्येची गांभीर्याने दखल घेऊन महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळानेही नुकतीच २०२९ पर्यंत राज्याला अमली पदार्थमुक्त करण्यासाठीच्या सर्वसमावेशक धोरणाला मंजुरी दिली. अमली पदार्थांचे स्वरूपही आता बदलले आहे. पारंपरिक तस्करीबरोबरच सिंथेटिक ड्रग्ज, डार्कनेट, एन्क्रिप्टेड संवाद, ऑनलाइन ऑर्डर आणि क्रिप्टोकरन्सीच्या माध्यमातून व्यवहार करणारी आधुनिक गुन्हेगारी यंत्रणा उभी राहिली आहे. अमली पदार्थांच्या विक्रीतून मिळणारा पैसा देशविरोधी कारवायांसाठी वापरला जात असल्याचे सांगितले जाते. संबंधित गुन्हेगारी जाळ्याच्या आर्थिक बळकटीकरणासाठीही त्याचा वापर होतो. त्यामुळेच अमली पदार्थांच्या तस्करीमागील देशविरोधी शक्तींना रोखण्याकरिता केंद्र सरकारकडून खेळ, कला, संस्कृती आणि युवाशक्तीच्या सहभागातून नशामुक्त भारताचा संकल्प देशभर पोहोचवला जाणार आहे. डार्कनेट आणि क्रिप्टो व्यवहारांचा माग काढण्यासाठी तंत्रज्ञानावर आधारित यंत्रणाही मजबूत केली जात आहे. महाराष्ट्रातील संबंधित नव्या धोरणाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याची सर्वसमावेशक व्याप्ती. अमली पदार्थांचे उत्पादन, वाहतूक, विक्री आणि सेवन यावर कठोर कारवाईसोबतच पुरवठा आणि मागणी दोन्ही कमी करण्यावर भर दिला जाणार आहे. गृह, परिवहन, बंदरे, महसूल, कृषी, वन, अन्न व औषध प्रशासन, उद्योग, शिक्षण, आरोग्य, क्रीडा, ग्रामविकास आणि सामाजिक न्याय अशा अनेक विभागांना या धोरणाअंतर्गत निश्चित जबाबदाऱ्या देण्यात आल्या आहेत. ग्रामस्तरापासून जिल्हा, विभाग आणि मंत्रालयापर्यंत समन्वयाची व्यवस्था उभारली जाणार आहे. या धोरणाचा सर्वात आशादायी भाग म्हणजे शाळेपासून सुरू होणारी जनजागृती. पुढील शैक्षणिक वर्षापासून इयत्ता पाचवीपासून अमली पदार्थांविषयी जनजागृतीचा किमान एक धडा अभ्यासक्रमात समाविष्ट केला जाणार आहे. यामुळे नशेचे दुष्परिणाम समजावून सांगण्याचे काम दरवर्षीच्या शैक्षणिक प्रक्रियेचा भाग बनेल. शाळा आणि महाविद्यालयांचे परिसर नशामुक्त ठेवण्यावरही भर दिला जाणार आहे. अमली पदार्थ नियंत्रण, पुरवठा कमी करणे, मागणी कमी करणे आणि व्यसनमुक्ती-उपचार-पुनर्वसन हे या धोरणाचे चार प्रमुख आधारस्तंभ आहेत. व्यसनाधीन व्यक्तीकडे केवळ गुन्हेगार म्हणून न पाहता उपचार आणि पुनर्वसनाची संधी देण्याचा मानवी दृष्टिकोनही यात अंतर्भूत असणार आहे. कठोर अंमलबजावणी आणि व्यापक जनजागृती यांचा संगम साधणारे हे धोरण म्हणजे केवळ सरकारी योजना नसून तो अवघ्या समाजाचा संकल्प ठरला पाहिजे. महाराष्ट्राने दिशा दाखवली आहे. आता सगळ्यांनी त्या दिशेने एकत्रितपणे चालण्याची गरज आहे. पालक, शिक्षक, विद्यार्थी, ग्रामसंस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकही या लढ्यात सहभागी झाले तर २०२९पर्यंत नशामुक्त महाराष्ट्राचे लक्ष्य गाठणे नक्कीच शक्य होईल.**

# गणेशमूर्ती व्यवसायातून महिलांना रोजगार



**खबरबात**
प्रकाश सोनवडेकर

गणेशोत्सवाला अवघे काही दिवस शिल्लक राहिल्याने पेणमधील गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये बाप्पाला अंतिम रूप देण्याची सध्या लगबग सुरू आहे. रायगड जिल्ह्यातील पेण तालुका गणपती मूर्तींचे माहेरघर म्हणून ओळखले जाते. येथील गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये पुरुष कारागिरांसोबत महिलाही खांद्याला खांदा लावून बाप्पाला अंतिम रूप देण्यात व्यस्त आहेत. मूर्ती घडवण्यापासून रंगकाम, डोळ्यांची आखणी, कलाकुसर, वस्त्रालंकार, पगडी आणि फेटे तयार करण्यापर्यंतची विविध कामे महिला कौशल्याने पार पाडत आहेत. विशेष म्हणजे केवळ सजावटीपुरता महिलांचा सहभाग मर्यादित राहिलेला नाही. अनेक महिला थेट मूर्ती घडविण्याच्या कामातही सहभागी झाल्या आहेत. रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या पुढाकारातून उमेद अभियानांतर्गतदेखील गणपती मूर्ती व्यवसायात महिलांनी पाऊल ठेवले आहे. महिलांना या व्यवसायातून रोजगार मिळू लागला आहे.

पेण तालुक्यातील अंतोरे, दादर, जोहे, कळवे, तांबडशेत, हमरापूर, वडखळ, बोरी, शिर्की, उंबर्डे, कोप्रोली तसेच पेण शहरातील कासार आळी, गुरव आळी, फणसडोंगरी, नवीन वसाहत, कुंभार आळी, गांगळ आळी, नंदिमाळ नाका आणि उत्कर्षनगर परिसरातील गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये सध्या लगबग पाहायला मिळत आहे. मूर्तींच्या प्राथमिक निर्मितीचे काम पूर्ण झाल्यानंतर आता रंगकाम आणि सजावटीची कामे अंतिम टप्प्यात आली आहेत. या कामात महिलांचा मोठा वाटा आहे. मूर्तीला आकर्षक रंगसंगती देणे, चेहऱ्यावरील भाव खुलवणे, डोळ्यांची आखणी करणे, कपडे तयार करणे, वस्त्रालंकार करणे तसेच मुकुट, पगडी आणि फेट्यांची सजावट करण्याची जबाबदारी अनेक महिला कारागीर समर्थपणे सांभाळत आहेत. विशेष म्हणजे केवळ सजावटीपुरता महिलांचा सहभाग मर्यादित राहिलेला नाही.

अनेक महिला थेट मूर्ती घडविण्याच्या कामातही सहभागी झाल्या आहेत. मातीपासून किंवा शाडूपासून मूर्तीला आकार देणे, हात-पाय आणि चेहऱ्याचे बारकावे तयार करणे, त्यानंतर रंगकाम आणि कलाकुसर करण्यापर्यंतची कामे त्या आत्मविश्वासाने करत आहेत. गणेशमूर्तीचा चेहरा आणि डोळ्यांची आखणी हा अत्यंत नाजूक आणि महत्त्वाचा टप्पा मानला जातो. मूर्तीच्या चेहऱ्यावरील भाव, डोळ्यांतील जिवंतपणा आणि रंगसंगती यामुळे मूर्तीचे सौंदर्य खुलते. त्यामुळे या कामासाठी कौशल्य आणि बारकाईची गरज असते. अनेक महिला कारागीर हे काम अत्यंत काळजीपूर्वक आणि कलात्मक पद्धतीने करत आहेत.

गणेशमूर्ती व्यवसायामुळे गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होते. विशेषतः मूर्तींच्या रंगकाम आणि सजावटीच्या कामांमध्ये महिलांना मोठ्या प्रमाणावर काम मिळते. जवळपास वर्षभर विविध प्रकारचे काम चालते. बाप्पाच्या आगमनापूर्वी प्रत्येक मूर्ती अधिक देखणी आणि आकर्षक करण्यासाठी महिला आणि पुरुष कारागीर रात्रंदिवस मेहनत घेत आहेत. पेण तालुक्यातील ज्या कार्यशाळा आहेत ते महिलांना वर्षभर काम असते. खासकरून कलाकुसर आणि मूर्ती वस्त्रालंकारांनी सजवण्याच्या कामात महिला तरबेज झाल्या आहेत. घरची कामे सांभाळून महिला हे काम करीत असतात. त्यातून त्यांना चांगला रोजगार उपलब्ध झाला आहे.

रायगड जिल्हा परिषदेच्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या पुढकारातून उमेद अभियानांतर्गत गणपती मूर्ती व्यवसायात महिलांनी पाऊल ठेवले आहे. जिल्ह्यातील सुमारे २४७ बचतगटातील महिलांनी एक लाख ५३ हजार ५४१ गणपतीमूर्ती तयार केल्या आहेत. यामधील दोन हजार २५० गणपती मूर्ती परदेशात पाठविण्यात आल्या आहेत. या व्यवसायात पेण तालुक्यातील महिला बचतगट उतरले आहेत. या व्यवसायासाठी उमेद अभियानामार्फत महिला बचतगटांना फिरता निधी तसेच ग्रामसंघांना समुदाय गुंतवणूक निधी आणि बँकांमार्फत पतपुरवठा करण्यात आला आहे. यामुळे महिलांच्या या व्यवसायाला गती प्राप्त झाली आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत जिल्ह्यातील सुमारे २४७ बचत गटातील महिला या गणपती व्यवसायात सहभागी झाल्या आहेत. महिला बचत गटांनी एक लाख ५३ हजार ५४१ गणपतीमूर्ती तयार केल्या असून यामधील दोन हजार २५० गणपती मूर्ती परदेशात पाठविण्यात येणार आहेत.

पूर्वी पेण शहरातच गणेशमूर्ती बनविण्याचे कारखाने होते. आसपासच्या परिसरातील कामगार या कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी यायचे. मागील काही वर्षांपासून पेण शहाराच्या जवळ असलेल्या हमरापूर, दादर, शिर्की, कणे आदी गावांमध्ये गणपतींचे कारखाने सुरू झाले आहेत. या गावांमधूनही मोठ्या प्रमाणांवर गणेशमूर्ती बनविल्या जातात. पेण शहारात असलेल्या कारखान्यांमधून काम करणारे कामगार गणेशमूर्ती बनविण्याची कला शिकले व त्यांनी स्वतःचे कारखाने सुरू केले. तसेच आसपाच्या गावांमधून येणारे कामगार जवळच्याच गावात किंवा स्वतःच्याच गावात काम मिळत असल्यामुळे ते पेणमध्ये काम करण्यासाठी येत नाहीत. परिणामी पेण शहरातील गणपती कारखान्यांमध्ये काम करण्यासाठी येणाऱ्या कुशल कामगारांची संख्या कमी झाली आहे.

पुरेसे कुशल कारमगार नसल्यामुळे पेणमधील गणपती कारखान्यांच्या मालकांना मोठी कसरत करावी लागत आहे. पेण शहरातील सर्वच गणपती कारखान्यांना ही समस्या भेडसावत आहे. आता महिला या क्षेत्रात आल्यामुळे गणेशमूर्ती कारखान्यांना भेडसावत असलेली कुशल कामगारांची समस्या काही प्रमाणात कमी होईल.

## बदलते तंत्रज्ञान

# ऑनलाईन शॉपिंग करताना 'ही' काळजी आवर्जून घ्या!

दिवाळी आली की बहुतेक सगळ्या ऑनलाईन शॉपिंग प्लॅटफॉर्मवर भरपूर डिस्काऊंट्स चालू असतात. अशा सिझनल डिस्काउंटच्या काळात शॉपिंग करणं अनेकदा फायदेशीर असतं पण हे करत असताना आपली फसवणूक होणार नाही याची काळजीही घेतली पाहिजे. ऑनलाईन शॉपिंग हल्ली मुलंही मोठ्या प्रमाणावर करतात. आईबाबांची क्रेडिट कार्ड्स वापरुन मुलांच्या आणि टिनेजर्सच्या शॉपिंगचं प्रमाण वाढत असताना, मोठ्यांबरोबरच मुलांनीही ऑनलाईन फसवणुकीपासून वाचण्यासाठी काय करायचं हे समजून घेतलं पाहिजे.




फेक वेबसाईटमध्ये मूळ खऱ्या वेबसाईटच्या नावात, लोगोच्या डिझाईनमध्ये किंचित बदल केलेला असतो. त्यामुळे वेबसाईट उघडताना, उघडल्यावर आपण ओरिजिनल वेबसाईटवरच आहोत ना हे तपासा. वेबसाईटवरचे कीप मी लॉग्ड इन किंवा रिमेम्बर मी सारखे पर्याय कधीही निवडू नका.

शॉपिंग ॲप किंवा वेबसाईटवर जर एखादा फॉर्म असेल आणि ऑटो फीलअप करा असं म्हणत असेल तर कधीही ऑटो फीलअप करू नका. या फॉर्म्समध्ये काही वेळा तुमचे बँक, क्रेडिट/डेबिट कार्ड डिटेल, सीव्हीव्ही नंबर, खाते क्रमांक या गोष्टीही सेव्ह करण्याची सोय असते. त्यांचा गैरवापर होऊ शकतो.

दिशाभूल करणाऱ्या ऑफर्स उदाहरणार्थ अमेझॉनकडून आयफोन मोफत मिळवण्यासाठी या लिंकला क्लिक करा. अशा प्रकारचा मेसेज आला, तर अगदी मूलभूत प्रश्न स्वतःला विचारा, अमेझॉन कशाला कुणाला आयफोन फुकट देईल? तरीही मोह होतच असेल तर एकदा अमेझॉनच्या साईटवर जाऊन खरंच अशी कुठली ऑफर सुरु आहे का हे तपासा. मागचा पुढचा विचार न करता, काहीतरी फुकट मिळतंय म्हणून गुन्हेगारांच्या गळाला लागू नका.

OTP कधीही कुणाशीही शेअर करू नका. जर समोरची व्यक्ती क्रेडिट किंवा डेबिट कार्डचा जद्धा मागत असेल तर तो तुम्हाला फसवतोय हे लक्षात घ्या आणि सुरू असलेलं संभाषण थांबवा. नंबर ब्लॉक करा. त्या नंबरवरुन आलेल्या लिंक्सवर क्लिक करू नका. तुम्ही ऑनलाईन तक्रारही नोंदवू शकता. https://cybercrime.gov.in/ या सरकारी साईटवर तुम्ही झालेल्या फसवणुकीची तक्रार नोंदवू शकता.

# बॉलीवूड अभिनेते ऋषी कपूर



**निमित्त**

चॉकलेट हीरो म्हणून लोकप्रिय असलेले अभिनेते ऋषी कपूर यांचा आज जन्मदिन आहे. ऋषी कपूर २०१८ पासून ल्युकेमियाशी (ब्लड कॅन्सर) झुंज देत होते. उपचारांसाठी ते अमेरिकेला गेले होते. ११ महिने तिथे उपचार घेतल्यानंतर सप्टेंबर महिन्यात ते भारतात परतले होते, तेथून परतल्यानंतर एका मुलाखतीत त्यांनी पुन्हा अभिनय करायची इच्छा व्यक्त केली होती. मात्र त्यानंतर काही महिन्यांतच त्यांचे निधन झाले होते. ऋषी यांनी १९७३ ते २००० दरम्यान ९२ रोमँटिक चित्रपटांत काम केले, त्यापैकी ३६ चित्रपट सुपहिट ठरले होते. २००८ मध्ये त्यांनी फिल्मफेअर लाइफटाइम अचिव्हमेंट अवॉर्डने सन्मानित करण्यात आले होते. शोमॅन राज कपूर यांच्या लाडक्या लेकाला चिंटू या निक नेमने ओळखले जायचे.

ऋषी कपूर पहिल्यांदा मोठ्या पडद्यावर १९५५ मध्ये रिलीज झालेल्या 'श्री ४२०' या चित्रपटात दिसले होते. वयाच्या अवघ्या तिसऱ्या वर्षी ते पहिल्यांदा कॅमेऱ्यासमोर आले होते. 'प्यार हुआ इकरार हुआ...' या गाण्यात ऋषी आपल्या भावंडांसह काही सेकंद दिसले होते. पावसातले दृश्य होते आणि ऋषी सतत डोळे बंद करायचे. नर्गिस यांनी चॉकलेट देऊन त्यांना समजावले होते. त्यानंतर १९७० मध्ये त्यांनी 'मेरा नाम जोकर'मध्ये अभिनय केला होता. त्यासाठी त्यांना राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. नायक म्हणून 'बॉबी' या पहिल्याच चित्रपटासाठी १९७४ मध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार मिळाला होता.

आपल्या ५० वर्षांच्या फिल्मी करिअरमध्ये ऋषी यांनी सुमारे १२१ चित्रपटांमध्ये काम केले. वयाच्या तिसऱ्या वर्षी सुरू झालेला हा प्रवास ६७ व्या वर्षांपर्यंत सुरू राहिला. बालकलाकार, मुख्य नायक आणि चरित्र अभिनेता अशा भूमिका त्यांनी वठवल्या. १९७३ ते २००० या काळात ९२ चित्रपटांत त्यांनी रोमँटिक भूमिका वठवल्या. त्यापैकी ३६ चित्रपट सुपरहिट ठरले. 'कर्ज', 'दीवाना', 'चांदनी', 'सागर', 'अमर अकबर एंथनी', 'हम किसी से कम नहीं', 'प्रेम रोग', 'हिना' हे त्यांचे निवडक गाजलेले चित्रपट आहेत.

ऋषी कपूर यांनी १९८० मध्ये अभिनेत्री नीतू सिंग यांच्याशी लग्न केले. दोघांनी १९७३ - १९८० या काळात १२ चित्रपट केले. या जोडीला पसंती मिळाली. दोघांचे अनेक चित्रपट हिट राहिले. जहरीला इंसान (१९७४), जिंदा दिल (१९७५), दूसरा आदमी (१९७७), अनजाने में (१९७८), झूठा कहीं का (१९७९) आणि धन दौलत (१९८०), दो दूनी चार (२०१०), बेशरम (२०१३) हे चित्रपट मात्र फ्लॉप ठरले होते.

२००० नंतर ४५ पेक्षा जास्त चित्रपटांत ऋषी यांनी चरित्र भूमिका साकारल्या. जलवा (२००२), हम तुम (२००४), फना (२००६), नमस्ते लंदन (२००७), लव आज कल (२००९) आणि पटियाला हाउस (२०१०) यासह अनेक चित्रपटांमध्ये ते दिसले. 'दो दुनी चार' या चित्रपटासाठी त्यांना फिल्मफेअर बेस्ट क्रिटिक ॲक्टर अवॉर्ड मिळाला. २०१६ मध्ये 'कपूर अँड सन्स'साठी सर्वोत्कृष्ट सहायक अभिनेता, २००८ मध्ये त्यांना जीवनगौरव पुरस्कार मिळाला. त्यांचा 'द बॉडी' हा चित्रपट २०१९ मध्ये आला होता. याशिवाय 'डोण्ट स्टॉप ड्रीमिंग' (२००७) आणि 'सांभर सालसा' (२००८) या इंग्रजी चित्रपटांमध्येही ते झळकले. २०१८ मध्ये उमेश शुक्ला दिग्दर्शित कॉमेडी-ड्रामा फिल्म '१०२ नॉट आउट'मध्ये त्यांनी अमिताभ बच्चन यांच्यासोबत काम केले होते. तब्बल २७ वर्षांनंतर ही जोडी पडद्यावर एकत्र आली होती.

**ऋषी कपूर यांना मिळालेले पुरस्कार**

१९७० - राष्ट्रीय पुरस्कार (चाइल्ड), १९७४ - फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा पुरस्कार, २००८ - फिल्मफेअर जीवनगौरव, २००९ - रशियन सरकारकडून विशेष सन्मान, २०११ - फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा क्रिटिक पुरस्कार, २०१६ - स्क्रीन जीवनगौरव, २०१७ - फिल्मफेअरचा सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्याचा पुरस्कार.

(साभार इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# नसांमधील कोलेस्ट्रॉल दूर करेल 'हा' ज्यूस

आजकाल चुकीच्या जीवनशैलीने अनेक आजार आपल्या मागे लागतात. अयोग्य आहारामुळे शरीरातील नसांमध्ये कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोकाही बळावतो. नसांमधील कोलेस्ट्रॉल कमी करायचं असेल तर एक ज्यूस तुमचं काम सोपं करणार आहे.



आजकाल धावपळीच्या जीवनात चुकीच्या आहाराचं सेवन मोठ्या प्रमाणात केलं जातं. या अनहेल्दी लाईफस्टाईलमुळे कोलेस्ट्रॉल वाढण्याचा धोका असतो. शरीरात वाईट आणि चांगलं अशा दोन प्रकारचं कोलेस्ट्रॉल असून वाईट कोलेस्ट्रॉल वाढल्यानंतर हृदयविकाराच्या झटक्याचा धोका वाढतो.

शरीरात कोलेस्ट्रॉल वाढू नये यासाठी चांगला आहार घेणं गरजेचं आहे, मात्र तुम्हाला माहितीये का, असा एक ज्यूस आहे तो तुमच्या नसांमध्ये जमलेलं वाईट कोलेस्ट्रॉल साफ करण्यात मगत करतं. शिवाय या ज्यूसच्या सेवनाने हृदयविकाराचा झटका येण्याचं प्रमाण देखील कमी होतं.

हा ज्यूस आवळा आणि गाजरचा आहे. मुळात आवळा आणि गाजर या दोन्ही गोष्टी आपल्या आरोग्यासाठी फायदेशीर असतात. आवळ्यामध्ये व्हिटॅमीन सीचं प्रमाण भरपूर असतं. जे कोलेस्ट्रॉलला कंट्रोल करण्यासाठी देखील फायदेशीर असतं. दुसरीकडे गाजरामध्ये बीटा कॅरोटीन असतं जे तुमच्या हृदयापर्यंत पोहोचणाऱ्या नसांना साफ ठेवतं.

हा ज्यूस तयार करण्यासाठी २ आवळे, २ गाजर, थोडसं पाणी आणि स्वादासाठी एक चमचा मध या साहित्याची गरज भासणार आहे. कृती- पहिल्यांदा आवळा आणि गाजर स्वच्छ धुवून घ्या. यानंतर आवळ्याचं ही काढून त्याचे छोट छोटे तुकडे करा. यासोबत गाजराचेही बारीक तुकडे करून घ्या. आता या दोन्ही गोष्टी मिक्सरमध्ये टाकून त्यात थोडं पाणी घाला. यानंतर ते चांगल्या पद्धतीने ब्लेंड करून त्याच मध टाका.

**कधी प्यावा हा ज्यूस?**

रोज सकाळी रिकाम्या पोटी हा ज्यूस प्यायल्याने वाईट कोलेस्ट्रॉल कमी होण्यास मदत मिळू शकते. त्याचप्रमाणे हृदयाच्या आजारांचा धोकाही कमी होतो. आवळा आणि गाजराचा ज्यूस नैसर्गिकरित्या कोलेस्ट्रॉल कमी करतं. त्याचप्रमाणे हा ज्यूस शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकतो. हृदयाच्या आरोग्यासोबत तुमची रोगप्रतिकारक शक्तीदेखील मजबूत होण्यास मदत होते.

# श्रीवर्धन नगर परिषदेकडून अतिक्रमणविरोधात मोहीम

## गटारांवर केलेले बांधकाम काढण्यात मात्र प्रशासन अपयशी

**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन नगर परिषदेने आज सकाळी श्रीवर्धन बाजार पेठेतील रस्त्यावर केलेल्या अतिक्रमणांवरती धडक मोहीम राबवली. बाजारपेठेतील जे भाजी विक्रेते रस्त्यावर प्लास्टिकचे रिकामे क्रेट ठेवून भाजी ठेवत होते. ती सर्व अतिक्रमण नगर परिषदेच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी आज काढून टाकली आहेत. त्यामुळे आज बाजारपेठेत फिरताना श्रीवर्धन बाजारपेठेतील रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला, अशी परिस्थिती दिसत होती. मात्र काही दुकानदारांनी गटारावरती अतिक्रमण करून पक्के बांधकाम केलेले आहे. अशा अतिक्रमणांवरती नगर परिषदेकडून कारवाई करण्यात आलेली नाही.गटारावर अतिक्रमण करणाऱ्या व्यापाऱ्यांना नोटीस देऊन कारवाई करण्यात यावी.



श्रीवर्धन बाजारपेठेत वाहतुकीची कोंडी नित्यनियमाने होत असे. त्यातच रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे अरुंद असलेला रस्ता अधिकच अरुंद होत असे. मागील अनेक वर्षांपासून श्रीवर्धन बाजारपेठेतील वाहतूक कोंडी व अतिक्रमण याबाबत बातम्या प्रसिद्ध करून सुद्धा कारवाई करण्यात येत नव्हती. मात्र आज नगरपरिषद प्रशासनाने पोलीस बंदोबस्त घेऊन सदरची कारवाई केली आहे. नगर परिषदेने प्लास्टिक पिशव्या बंदीसाठी देखील अशाप्रकारे धडक मोहीम राबवण्याची आवश्यकता आहे. सोमवारी श्रीवर्धन बाजारपेठेतील किराणा मालाची व कपड्याची दुकाने बंद असतात. याच दिवशी नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी प्लास्टिक पिशव्यांबाबत मोहीम राबविली होती.

अजून अनेक ठिकाणी श्रीवर्धन नगरपरिषदेच्या गटारांवरती अतिक्रमण झालेले आहे अनेकांनी आपल्या लोखंडी शेड थेट रस्त्यावरती अँगल पुरून काढलेल्या आहेत. या गटारावरती झालेल्या बांधकामांकडे नगरपरिषद केव्हा कारवाई करेल? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. या अतिक्रमणांबरोबरच मच्छी विक्री करणाऱ्या महिलांसाठी नगर परिषदेचे मार्केट उपलब्ध असताना सुद्धा अनेक मच्छी विकणाऱ्या महिला या बाहेर रस्त्यावरती बसल्याने त्या ठिकाणी दुर्गंधीचे साम्राज्य पसरते. तरी रस्त्यावर व बाहेर बसणाऱ्या मच्छी विक्रेत्यांना मार्केटमध्ये बसण्यासाठी देखील नगर परिषदेने धडक कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

## पेणमध्ये घर फोडून लाखोंचा ऐवज लंपास

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरात चोरट्यांनी पुन्हा धुमाकूळ घातला असून, एकाच रात्री दोन घरांची कुलपे फोडून तब्बल ३ लाख २२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना समोर आली आहे. कुंभार आळी तसेच संत आळी नवी वसाहत परिसरात झालेल्या या घरफोड्यांमुळे शहरातील नागरिकांमध्ये खळबळ उडाली असून, सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

दि. १ सप्टेंबर रोजी रात्री १.३० ते सकाळी ६.३० वाजण्याच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी दोन्ही घरांच्या मुख्य दरवाज्यांचे लॉक तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर लोखंडी कपाटांचीही कुलपे फोडून सोन्याचे दागिने आणि रोख १ लाख ५ हजार रुपयांची रक्कम, असा एकूण ३ लाख २२ हजार रुपयांचा ऐवज घेऊन चोरटे पसार झाले.

या प्रकरणी सुबोध दत्तात्रय पाटील आणि राजेश रमेश म्हात्रे यांनी पेण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.



**अलिबाग : रायगड जिल्ह्याच्या इतिहासात बुधवारी श्री मरीआई मेटपाडा गोविंदा पथकाने सरावादरम्यान नऊ थरांची सलामी दिली.**


### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीस द्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात वर्णन केलेली सामाईक मिळकत ही त्यांची विद्यमान मालक **श्री. गंगाराम बाळकृष्ण म्हात्रे व ईतर** यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याबाबतचा व्यवहार आमचे अशिल यांनी ठरविला आहे व या व्यवहाराची जाहीर नोटीस वर्तमानपत्र देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. गंगाराम बाळकृष्ण म्हात्रे व ईतर** यांनी आमच्या अशिलांना लेखि पत्राद्वारे संगितले आहे व आमचे अशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटिस मी देत आहे.

मिळकतीचे वर्णन–: **मौजे– पिरकोन (५५३३३९)**
**(ULPIN : 18611261082), तालुका–उरण, जिल्हा–रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १६०/२/अ<br>खाते क्रमांक :१४४४ | १ | ०.२०.८०<br>पो.ख. ०.०२.०० | २.०० |
| | | एकूण क्षेत्र– **०.२२.८०** | |

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही तिरहित व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान बक्षीस, खरेदीखत साठे करार मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ, हक्क, वारसा, वहीवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती किवा त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथम दर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदपत्रे पत्रात पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावे अन्यथा दिलेल्यामुदतीत कोणाचीही हरकत न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाही व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल सदर मिळकतीचे खरेदी करण्याचा व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून ७ दिवसांच्या मुदती नंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधन कारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक – ०३/०९/२०२६

**सही/–**
**ॲड. निलेश बा. झंजाड**

बी–१०४ सफायर सी.एच.एस.ली., सेक्टर २२ भूखंड क्रमांक ३३/३४ कामोठे ता. पनवेल जि. रायगड – ४१०२०६
मो.क्र– : ९९२०४ ७५८०१


# मळेघर ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत घरकुल यादीवरून वाद; सदस्यांना मारहाण

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील मळेघर ग्रुप ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थी यादीवरून झालेला वाद चांगलाच पेटला असून प्रकरण थेट पोलीस ठाण्यात पोहोचले आहे. महिला ग्रामपंचायत सदस्याशी गैरवर्तन करून मारहाण झाली असून अन्य दोघांना दुखापत केल्याच्या आरोपावरून पेण पोलीस ठाण्यात ७ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,३१ ऑगस्ट रोजी ग्रामसभा आयोजित करण्यात आली होती. या सभेत पंतप्रधान आवास योजनेच्या लाभार्थ्यांची यादी वाचून दाखविण्यात आली. या यादीतील काही लाभार्थी बाहेरील गावातील असल्याचा आक्षेप घेण्यात आला. तसेच मौजे वडगाव गावठाण हद्दीत त्यांना घरकुल बांधण्यास हरकत असल्याचे लेखी निवेदन वैशाली साळवी, सुनील साळवी, कैलास पवार, सुहास पवार आणि संजीवनी पवार यांनी ग्रामसेवकांकडे दिले होते.

या निवेदनात दिलीप पाटील, जनार्दन पाटील, बुधाजी तायडे आणि प्रणेश पाटील यांच्या नावांवर आक्षेप नोंदविण्यात आला होता. हे निवेदन ग्रामसभेत वाचून दाखवावे, अशी मागणी करण्यात आल्यानंतर ग्रामपंचायत सदस्य दयान पेणकर, कमलाकर म्हात्रे आणि उपसरपंच मच्छिंद्र म्हात्रे यांनी विरोध केल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर ग्रामसभा बरखास्त झाल्याचे जाहीर करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

दरम्यान, या प्रकरणात गटविकास अधिकाऱ्यांशी दूरध्वनीवरून संपर्क साधल्याचा राग मनात धरून मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे. एफआयआरनुसार, दिलीप पाटील याने महिला सदस्याशी शिवीगाळ करून गैरवर्तन केले तसेच लाकडी धोपटण्याने त्यांच्या डोक्यावर व खांद्यावर मारहाण केली. जनार्दन पाटील, दयान पेणकर, कमलाकर म्हात्रे, धनिका पाटील, निलिमा पाटील आणि जयवंती पाटील यांनीही हाताबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप आहे.वाद सोडविण्यासाठी पुढे आलेल्या सुनील साळवी यांना दगडाने मारहाण करण्यात आल्याचे, तर संजीवनी पवार यांच्या डोक्यात लाकडी धोपटणे मारून त्यांना जखमी केल्याचे तक्रारीत नमूद आहे.

या गोंधळात तेजस्विनी साळवी यांचे सुमारे २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र तुटून गहाळ झाल्याचाही उल्लेख एफआयआरमध्ये आहे.

## मोरगिरीतील 'पोक्सो'प्रकरणी आठपैकी सात आरोपी निर्दोष मुक्त; अल्पवयीन आरोपीबद्दल आज निकाल

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील मोरगिरी येथील अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचाराचा 'पोक्सो' गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आठ आरोपींपैकी सात आरोपी निर्दोष मुक्त करण्यात आले असून अल्पवयीन असलेल्या आरोपी क्रमांक ६ चा आज माणगाव सत्र न्यायालयात निकाल दिला जाणार आहे. यामुळे पोलादपूर तालुक्यातील बहुचर्चित 'सेक्स स्कँडल'ला अखेर पुर्णविराम मिळण्याची चिन्हे दिसत आहेत.

पोलादपूर येथील जत्रोत्सवातून मोरगिरीतील भोसले फार्महाऊस येथे नेऊन अल्पवयीन मुलीवर जबरदस्तीने लैंगिक संबंध ठेवत बलात्कार करून पुन्हा पोलादपूर एस टी बसस्थानकाजवळ सोडून दिल्याची फिर्याद पोलादपूर पोलीस ठाण्यात मोरगिरी दळवीवाडीतील आरोपी निलेश प्रकाश दळवी विरुध्द दि.९ ऑगस्ट २०१८ रोजी दाखल करण्यात आली होती. यानंतर महाड शिंदेकोंड येथील संकेश उर्फ संकेत दत्ताराम घाणेकर,पोलादपूर शहरातील सैनिकनगर येथील माणिक उर्फ तुषार शांताराम जाधव, शिवाजीनगर येथील सुज्योत सुभाष गांधी, भैरवनाथनगर येथील मोहित सुभाष बुटाला उर्फ गुजर , पोलादपूर तालुक्यातील ओंबळीतील सध्या दिवा ठाणे येथील रहिवासी अजय रमेश सकपाळ तसेच अल्पवयीन आरोपी शुभम दीपक शिंदे यांची पोलादपूर पोलिसांनी तपासाअंती धरपकड सुरू केली. २०१८ च्या अनंत चतुर्दशीच्या संध्याकाळी यापैकी ४ आरोपी पोलादपूर पोलिसांनी ताब्यात घेतले.

माणगाव सत्र न्यायालयात पिडित मुलीचा फौजदारी प्रक्रिया संहिता १६१ व १६४ अन्वये जबाब घेण्यात आला. याचदरम्यान पिडित अल्पवयीन मुलगी प्रसुत होऊन तिला मुलगी झाली. न्यायवैद्यक प्रयोगशाळेत झाल्यानंतर डिएनए टेस्ट केवळ अजय सकपाळ याच्यासोबत जुळली होती.

कॉल रेकॉर्ड, अल्पवयीन मातृत्व लाभलेल्या पिडितेच्या जन्म प्रमाणपत्रावर तिच्या आईचे नाव वेगळे आणि पालकांचा पत्ता नसल्याने अल्पवयीन असल्याचा पुरावा अग्राह्य आहे तसेच तिचे विविध आरोपींबाबतचे कथन विश्वासार्हतेचे नसल्याने या प्रकरणात न्यायाधीश मुकेश कमलाकर पाटील आरोपी क्र. १) निलेश प्रकाश दळवी, २) संकेश ऊर्फ संकेत दत्ताराम घाणेकर, ३) माणिक ऊर्फ तुषार शांताराम जाधव, ४) सुज्योत सुभाष गांधी, ५) मोहित बुटाला ऊर्फ गुजर, ७) सागर शिवराम नगरकर, ८) अजय रमेश सकपाळ या आठ पैकी सात आरोपींना याप्रकरणी पोक्सो गुन्ह्यातून निर्दोष मुक्त केले.

पिडीत मुलीपेक्षा दीड वर्षांनी लहान असलेला अल्पवयीन आरोपी शुभम दीपक शिंदे याची कर्जत येथील बालसुधारगृहात रवानगी करण्यात आली. केवळ दहावी इयत्तेत शिकत असताना शुभम दीपक शिंदे याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## युवा महोत्सवाच्या वक्तृत्व स्पर्धेत द.ग. तटकरे महाविद्यालयाचे यश



**तळा : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठ युवा महोत्सवाची विविध सांस्कृतिक स्पर्धांचीअंतिम फेरी मुंबई विद्यापीठ मुंबई येथे सुरू झाल्या असून वक्तृत्व (हिंदी) स्पर्धेची अंतिम फेरी १ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई विद्यापीठ, विद्यार्थी भवन चर्चगेट येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाचा विद्यार्थी पंकज पंढरीनाथ पांडुळे याने द्वितीय क्रमांक प्राप्त केला आहे. ग्रामीण भागातील या महाविद्यालयाने मागील २५ वर्षापासून युवा महोत्सवात वक्तृत्व, वाद विवाद स्पर्धांमध्ये महाविद्यालयाची यशाची परंपरा कायम राखली आहे. या परंपरेत पंकज पांडुळे या विद्यार्थ्याने अंतिम फेरीत रौप्य पदक प्राप्त करून महाविद्यालयाचे नाव विद्यापीठ स्तरावर उंचावले आहे. या विद्यार्थ्यांना सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.भगवान लोखंडे व प्रा. भरत चाळके यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल संस्थेचे विश्वस्त नंदकुमार वेदक, मारुती शिर्के, विठ्ठल जोशी संस्थेचे पदाधिकारी ,संस्थेच्या कार्यकारी मंडळाचे व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.नानासाहेब यादव, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी पंकज पांडुळे याचे अभिनंदन केले.



**लोणेरे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाचा २८वा दीक्षांत समारंभ गुरुवारी विद्यापीठाच्या पदवीका सभागृहात पार पडला. यावेळी महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तसेच संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांचे भाजप नेते पंकज तांबे यांनी स्वागत केले. भाजप माणगाव तालुका अध्यक्ष युवराज मुंढे, बापू सोनगिरे, सीताराम उभारे, युवा नेते स्वप्नील शिर्के, संभाजी गायकवाड उपस्थित होते.**


### पनवेल येथे तातडीने भरती

भरती पदे

लेखापाल (Accountant)

साईट इंजिनिअर (Site Engineer)

आर्किटेक्ट (Architect)

वकील (Lawyer)

कार्यालयीन कर्मचारी / लिपिक (Clerk)

अनुभवी उमेदवारांना प्राधान्य

स्थान: Panvel

संपर्क: +91 84518 27666

ईमेल:landmastergroup15@gmail.com

आपल्या करिअरला नवी दिशा!


# गणेशोत्सवाची तयारी प्रभावीपणे करा –कृषी सभापती वैकुंठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

आगामी गणेशोत्सव व गोविंदा दहीहंडी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर उत्सव शांततेत, शिस्तबद्ध आणि सुरक्षित वातावरणात आनंदाने पार पाडण्यासाठी आवश्यक असणारे सर्व गोष्टीची पूर्ततेसाठी परिसर आणि गणेश विसर्जन घाटाची स्वच्छता साफसफाई आरोग्य पाणी पूरवठा या बाबी त्वरेने करा शाळा अंगणवाडी देखभाल दुरुस्तीसाठी जो नीधी प्राप्त झाला आहे ती कामे मार्गी लावा ग्रामपंचायतीची मालमत्ता कर वसूली आणि गतीमान प्रशासनावर भर देण्याचे आदेश रायगड जिल्हा परिषदेचे कृषी पशुसंवर्धन सभापती वैकुंठशेट पाटील यांनी ग्रामसेवक आरोग्य कर्मचारी शिक्षक अंगणवाडी सेविका आशा स्वयंसेविका कृषी कर्मचारी यांना आढावा बैठकीत दिले..



कृषी सभापती वैकुंठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या आढावा बैठकीप्रसंगी झेडपी सदस्य हरीओम प्रभाकर म्हात्रे ताई जोमा दरवडा जनार्दन भस्मा पंचायत समिती सभापती स्मिता पाटील उपसभापती संजय डंगर गटनेते विवेक म्हात्रे सदस्य प्रदीप म्हात्रे सुशांत खाकर मेघा पाटील कमळ पवार अस्मिता पाटील गटविकास अधिकारी गजानन लेंडी बाजार समिती संचालक जोमा दरवडा जिल्हा परिषदेचे सर्व विभागाचे अधिकारी कर्मचारी यांची उपस्थीती होती.

गणेशोत्सव आपल्या कोकणाचा महत्वाचा उत्सव आहे.तो साजरा करताना ग्रामपंचायत परिसर स्वच्छता आरोग्याशी निगडीत सर्व गोष्टीची प्रभावी अंमलबजावणी करण्याबरोबर अंगणवाड्यातील उणिवावर बोट ठेवीत त्याबाबत महिला बाळकल्याण अधिकारी यांनी सचेतपणे गांर्भियाने काळजी घेऊन पेण शहापाडा येथील अंगणवाडीतील समस्या दूर कराव्यात.ग्रामपंचायतीची रखडलेली सुमारे १२कोटीहून अधिक मालमत्ता कराची वसूली बाबत संबधीत कंपन्याना करभरणा नोटीस पाठविण्याचे सक्त आदेश याच बरोबर नादुरुत शाळा व अंगणवाड्याची तातडीने दुरुस्ती बाबतचे सक्त आदेश आज संबधीत शालेय शिक्षण विभागाला देण्यात आले

कोणत्याही कर्मचा–यांनी चालढकलपणा केला तर त्याची गय नाही अशा कडक सूचना देत कृषी सभापती वैकुंठ पाटील यांनी आढावा घेताना दिल्या.गणेश उत्सवाच्या काळात नागरिकांना कोणत्याही प्रकारची गैरसोय होणार नाही याची काटेकोर दक्षता घेण्याचे ही शेवटी सांगितले.


### अर्जंट पाहिजेत

पनवेल मधील कन्स्ट्रक्शन व्यवसायामधील एका नामवंत कंपनीसाठी ऑफिसमध्ये कामाकरिता खालील पदाकरिंता भरती आहे.

१) बिल्डींग कन्स्ट्रक्शन इंजिनीयर (Civil) पद – १
Building Construction Engineer (Civil) – 1

२) सेल्स एक्झिक्युटिव्ह (स्त्री) पद – १
Sales Executive (Female) – 1

३) रिसेप्शनिस्ट कम अकाऊंटट (स्त्री) पद – १
Receptionist Cum Accountant (Female) – 1

४) ऑफिस बॉय पद – १
Peon – 1

संपर्क :– 8879595974

# आठ महिन्यांत ३० लाख प्रवासी

## नवी मुंबई विमानतळाची भरारी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने व्यावसायिक विमानसेवा सुरू केल्यानंतर अवघ्या आठ महिने आठ दिवसांत ३० लाख प्रवाशांचा टप्पा ओलांडला आहे. २५ डिसेंबर २०२५ रोजी सेवा सुरू झाल्यानंतर २०० दिवसांपेक्षा कमी कालावधीत विमानतळावरून अबूधाबीला नियोजित आंतरराष्ट्रीय विमानसेवाही सुरू झाली. विमानतळावरील गंतव्यस्थानांची संख्या आता १३वरून ४६ झाली असून सुमारे २२ हजार ५०० व्यावसायिक विमानफेऱ्या हाताळण्यात आल्याची माहिती नवी मुंबई विमानतळ प्रशासनाने दिली.

ऑगस्टमध्ये विमानतळावर सरासरी ९४ टक्के प्रवाशांना त्यांची शेवटची सामानाची बॅग निर्धारित वेळेत मिळाली. प्रवाशांना सुरळीत सेवा देण्यावर विमानतळ प्रशासनाचा भर असल्याचा दावा या कामगिरीतून केला जात आहे. मुंबई महानगर प्रदेशाला देशातील प्रमुख शहरांशी जोडण्याच्या दृष्टीने



विमानतळाच्या हवाई मार्गिकांमध्ये सातत्याने वाढ करण्यात येत आहे. यापुढे उदयपूर, जोधपूर, रांची, दरभंगा, गुवाहाटी आणि सिंधुदुर्ग या सहा नव्या देशांतर्गत गंतव्यस्थानांचा समावेश होणार आहे. त्यामुळे या शहरांकडे जाणाऱ्या प्रवाशांना नवी मुंबई विमानतळावरून अधिक हवाई पर्याय उपलब्ध होतील.

हिवाळी वेळापत्रक सुरू होण्यापूर्वी नोव्हेंबर २०२६ मध्ये नव्या विमान कंपन्या आणि हवाई मार्गिकांचा समावेश करून आंतरराष्ट्रीय हवाई संपर्काचा आणखी विस्तार करण्याचे विमानतळ कंपनीचे नियोजन आहे.नवी मुंबई विमानतळाच्या प्रवयांनी दिलेल्या माहितीनुसार अतिरिक्त हवाई मार्गिका आणि विमान कंपन्यांच्या भागीदारीच्या माध्यमातून देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये विस्तार करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. मुंबई महानगर प्रदेशातील हवाई संपर्क आणखी चांगला करण्याबरोबरच पश्चिम भारतासाठी महत्त्वाचे हवाई प्रवेशद्वार म्हणून या विमानतळाची ओळख होईल, असे नियोजन केले जात आहे.

पूर्ण क्षमतेने कार्यरत झाल्यानंतर विमानतळाची वार्षिक नऊ कोटी प्रवासी हाताळण्याची क्षमता असेल. प्रारंभीच्या टप्प्यात दोन कोटी प्रवाशांची वार्षिक क्षमता विकसित करण्यात आली आहे. दरवर्षी पाच लाख मेट्रिक टन मालवाहतूक हाताळण्याची क्षमता उपलब्ध होणार आहे. अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड व सिडको महामंडळ यांच्या सार्वजनिक-खासगी भागीदारीतून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित करण्यात आले. मुंबई महानगर प्रदेशातील दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ म्हणून विद्यमान विमानतळावरील वाढता हवाई वाहतुकीचा ताण कमी करण्यासह नवी मुंबई परिसरातील आर्थिक आणि शहरी विकासाला चालना देण्याची अपेक्षा आहे.

# गणरायाच्या स्वागताची लगबग

## ढोल-ताशा पथकांच्या सरावाला वेग

**नवी मुंबई : बातमीदार**

गणेशोत्सवाच्या आगमनाची चाहूल लागताच नवी मुंबईतील वातावरण हळूहळू भक्तिमय होऊ लागले आहे. बाप्पाच्या स्वागतासाठी गणेश मंडळांची लगबग सुरू असतानाच आगमन मिरवणुकीला पारंपरिक वाद्यांची साथ देणाऱ्या ढोल-ताशा, ब्रास बँड आणि बँजो पथकांच्या तालमींनाही वेग आला आहे. सायंकाळच्या वेळी विविध भागांतून ऐकू येणारा ढोल-ताशांचा निनाद आणि बँडच्या सुरांमुळे उत्सवाचा उत्साह आतापासूनच जाणवू लागला आहे.

गणेशोत्सव हा भक्ती आणि श्रद्धेसोबतच महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचे दर्शन घडविणारा उत्सव आहे. गणरायाच्या आगमन मिरवणुकीत ढोल-ताशा, बँजो आणि ब्रास बँडला विशेष महत्त्व असल्याने



वादक कलाकारांकडून सरावावर भर दिला जात आहे. नवी मुंबईतील छाया कला सर्कल ब्रास बँड, प्रेम सागर ब्रास बँड, साई कला सर्कल ब्रास बँड यांसह विविध बँजो पथकांतील कलाकार तयारीला लागले आहेत.शहरातील मैदाने, सोसायट्यांचे आवार तसेच मोकळ्या जागांमध्ये सायंकाळच्या सुमारास तालमी रंगताना दिसत आहेत. वादनातील ताल, लय, एकसंधपणा आणि अचूकता साधण्यासाठी कलाकारांकडून कसून सराव केला जात आहे.

पारंपरिक गणेशोत्सवी गाण्यांसोबतच नव्या गीतांच्या तालांवरही कलाकार मेहनत घेत असून, आगमन मिरवणुकीत आपल्या वादनाची वेगळी छाप पाडण्यासाठी प्रत्येक पथकाची तयारी सुरू आहे. गणेशमूर्तींच्या आगमनाची तयारी, मंडप उभारणी, सजावट, आकर्षक आरास व विद्युत रोषणाईच्या कामांनाही वेग आला आहे. मंडळांचे कार्यकर्ते विविध नियोजनांमध्ये व्यस्त असून परिसर सजविण्याची लगबग सुरू झाली आहे. त्यामुळे आगमन मिरवणुकीची रंगत अधिकच वाढणार आहे.

# दिवाळे कोळीवाड्यात भटक्या कुत्र्यांचा हैदोस

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील दिवाळे कोळीवाडा परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेषतः रात्री उशिरा कामावरून घरी परतणारे नागरिक तसेच पहाटेच्या वेळी मासेमारीसाठी किंवा कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या कोळीबांधवांना या भटक्या कुत्र्यांचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांच्या मागे कुत्र्यांचे कळप



लागणे, जोरजोरात भुंकत अंगावर धावून जाणे, पाठलाग करणे, तसेच प्रसंगी हल्ला करून नागरिकांना जखमी करण्याच्या घटना घडत असल्याचे स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पहाटे अथवा रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. दिवाळे कोळीवाड्यातील रस्ते आणि गल्लीबोळांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या वाढत असल्याने भविष्यात एखादी गंभीर दुर्घटना घडण्यापूर्वी नवी मुंबई महानगरपालिकेने या समस्येकडे गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे.

दरम्यान, केवळ तात्पुरती कारवाई न करता भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित करण्यासाठी प्राणी जन्मनियंत्रण कार्यक्रम, लसीकरण, निर्बीजीकरण तसेच धोकादायक कुत्र्यांबाबत नियमानुसार आवश्यक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याची मागणी आता नागरिकांकडून होत आहे. दरम्यान, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता महापालिका प्रशासनाने संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने पाहणी करण्याचे निर्देश देऊन कुत्र्यांच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करावी, अशी अपेक्षा स्थानिकांकडून व्यक्त होत आहे. भटक्या कुत्र्यांनी नागरिकांवर हल्ला केल्याच्या अनेक घटना वारंवार समोर येत असतात.

# शिरवणे गावात दहीहंडीचा थरार; भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

शिरवणे गावातील कै. विनोद सारिका स्मृती कला क्रीडा मंडळाच्या भव्य दहीहंडी उत्सवाची परंपरा कायम राखत यंदा सतराव्या वर्षात पदार्पण होत आहे. याही वर्षी कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण 'नाचानं रंगलाय कोळीवाडा' हा सुप्रसिद्ध ऑर्केस्ट्रा कार्यक्रम सादर होणार आहे. दहीहंडीच्या अनुषंगाने रील स्पर्धा आयोजित केली असून, सदर स्पर्धेची बक्षिसे अनुक्रमे प्रथम २,०००, द्वितीय १,५००, तृतीय १,००० रुपये या पद्धतीने असतील.

तसेच केवळ राधाकृष्ण वेशभूषा परिधान करून आलेल्या मुला-



मुलींना भेटवस्तू देऊन प्रोत्साहित करण्यात येणार आहे.विशेष म्हणजे मोबाईल लकी ड्रॉद्वारे उपस्थित भाग्यवंत महिला आणि पुरुष यांना मोबाईल जिंकण्याची सुवर्णसंधी उपलब्ध असून, वय वर्षे पंधरापर्यंतच्या वयोगटातील मुलांकरिता लकी ड्रॉद्वारे सायकल जिंकण्याची संधी आहे. तसेच प्रभागातील सर्व वयोगटातील मुला-मुलींसाठी आपले कला-कौशल्य सादर करण्याकरिता खुले व्यासपीठ उपलब्ध करून प्रोत्साहनात्मक बक्षिसे अशा प्रकारे भरगच्च कार्यक्रम मंडळाकडून आयोजित करण्यात आला आहे.

मंडळाचे हे १७वे वर्ष असून हे मंडळ वैद्यकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक अशा सर्व स्तरांतून काम करत असून, या कृष्णजन्माष्टमी दहीहंडी उत्सवाच्या माध्यमातून आपली संस्कृती आणि परंपरा जपण्याचे काम होणार असल्याची माहिती कार्यक्रमाचे आयोजक जयेंद्र अरुण सुतार यांनी दिली.

# सीकेटी विद्यालयात बालगोपाळांच्या जल्लोषात दहीहंडी उत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर विद्यालय इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांच्या बालमनातील उत्साह, निरागस आनंद आणि भारतीय संस्कृतीची सुंदर अनुभूती देणारा दहीहंडी उत्सव मोठ्या उत्साहात व आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला.

मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे तसेच पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात चिमुकल्या बालगोपालांनी श्रीकृष्ण, राधा व गोपिकांच्या मनमोहक वेशभूषेत उपस्थित राहून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. नटखट कान्हाच्या वेशातील बालगोपाल आणि राधेच्या वेशातील चिमुकल्या गोपिकांनी संपूर्ण वातावरणच कृष्णमय करून टाकले. 'गोविंदा आला रे आला...', 'गोविंदा रे गोपाळा...' अशा उत्साहवर्धक गीतांच्या



तालावर बालगोपाळांनी मनसोक्त नृत्य केले.

यावेळी प्रमुख अतिथी के. व्ही. कन्या शाळा, पनवेलच्या सेवानिवृत्त पर्यवेक्षिका स्मिता विजय हर्डीकर यांच्या हस्ते राधाकृष्णाचे तसेच दहीहंडीचे पूजन करण्यात आले. दहीहंडी फोडण्याच्या क्षणी विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला. हंडी फुटताच झालेला टाळ्यांचा कडकडाट, आनंदाचा जल्लोष आणि चिमुकल्यांच्या चेहऱ्यावरील हास्याने शाळेचा परिसर आनंदाने भारून गेला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाच्या बाललीला, दहीहंडी उत्सवाचे सांस्कृतिक महत्त्व आणि आपल्या भारतीय परंपरांची ओळख करून देण्यात आली. तसेच दहीहंडीच्या माध्यमातून एकजूट, सहकार्य, संघभावना आणि परस्परांना साथ देण्याचे महत्त्व बालमनावर बिंबविण्यात आले.

कार्यक्रमासाठी सेवानिवृत्त पर्यवेक्षिका स्मिता हर्डीकर, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका स्वाती काळे, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक व प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका नीलिमा शिंदे, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधूरी, पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी त्याचबरोबर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये डॉक्टरविरोधात विनयभंगाचा गुन्हा दाखल

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

विनयभंग केल्याप्रकरणी डॉक्टर तुकाराम शिंदे (रा. कल्पतरू सोसायटी, तक्का) यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जून २०२६ पासून पीडित फिर्यादी यांनी त्यांचे काम संपल्यानंतर लाईफ केअर हॉस्पिटल, विचुंबे येथील ड्युटीची माहिती सांगण्यासाठी त्यांच्या मोबाईलवर कामाची माहिती व्हॉट्सॲपवर मेसेज स्वरूपात पाठवली. यावेळी डॉक्टर तुकाराम शिंदे हे मोबाईलवर स्टार हार्ट, गुलाब, किसचे इमोजी, डबल मिनिंग बोलणे, निगेटिव्ह कमेंट करणे, 'हॉटेलमध्ये जाऊ, फिरायला जाऊ, लंचला जाऊ' असे नेहमी मोबाईलवर मेसेजचे



रिप्लाय करीत असत.

दरम्यान, २० ऑगस्ट रोजी रात्री पावणेनऊच्या सुमारास डॉक्टर तुकाराम शिंदे यांना पेशंटबद्दल माहिती सांगण्यासाठी फिर्यादी केबिनमध्ये गेल्या असता फिर्यादी यांना पकडून त्यांच्याशी गैरवर्तन केले. यावेळी फिर्यादी यांनी आरोपीला फिजिकल रिलेशनशिपसाठी स्पष्ट शब्दांत विरोध केला. याप्रकरणी खांदेश्वर पोलिसांनी २७ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल केला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# एमएनएम विद्यालयात विद्यार्थ्यांनी साकारली शिक्षकाची भूमिका

**उलवे : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था अंतर्गत एम.एन.एम. विद्यालय व टी.एन.जी. कनिष्ठ विज्ञान विद्यालयात शिक्षक दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी अनोख्या आणि शैक्षणिक उपक्रमातून शिक्षक दिन उत्साहात साजरा केला. संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांच्या सहभागातून नेतृत्व, आत्मविश्वास आणि जबाबदारीची जाणीव निर्माण करण्याचा सुंदर प्रयत्न करण्यात आला. या उपक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे इयत्ता दहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका स्वीकारली.

विद्यार्थ्यांनी पूर्वतयारी करून शिक्षकांप्रमाणे वर्गात प्रवेश केला आणि नर्सरीपासून बारावीपर्यंतच्या विविध इयत्तांमध्ये विद्यार्थ्यांनीच शिक्षक बनून मुलांना अध्यापन केले. त्यामुळे संपूर्ण विद्यालयात एक वेगळाच उत्साह आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शिक्षकाची भूमिका साकारताना विद्यार्थ्यांना वर्ग व्यवस्थापन, अध्यापन पद्धती, संवादकौशल्य, संयम आणि शिक्षकांची जबाबदारी यांचा प्रत्यक्ष



अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या भूमिकेतून अध्यापन करताना आपल्या शिक्षकांच्या मेहनतीची आणि विद्यार्थ्यांना घडविण्यामागील योगदानाची जाणीवही अनुभवली.कार्यक्रमाची सुरुवात स्वागत व परिचय आणि दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर स्वागतपर भाषण, शिक्षक दिन विशेष नाटिका, विद्यार्थ्यांचे नृत्य सादरीकरण तसेच शिक्षकांसाठी विविध गमतीदार खेळ व मनोरंजक उपक्रम घेण्यात आले.

विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील संवाद वाढविण्यासाठी विशेष संवादात्मक सत्रही आयोजित करण्यात आले. यावेळी शिक्षकांच्या कार्याचा गौरव करत शिक्षकांचा सत्कार व कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करत शिक्षक दिनाचा खरा अर्थ आपल्या कृतीतून अधोरेखित केला.विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर यांनी विद्यार्थ्यांच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. दरम्यान, विद्यार्थ्यांनी शिक्षक बनून केलेला हा उपक्रम केवळ मनोरंजनात्मक नसून 'शिक्षक होणे म्हणजे काय' याची जाणीव करून देणारा अनुभवात्मक शिक्षणाचा सुंदर उपक्रम असल्याचे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून स्पष्ट केले. कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शन करण्यात आले आणि राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# टेम्पोचा अपघात; अडकलेल्या चालकाला काढले बाहेर

**पनवेल : वार्ताहर**

सायन-पनवेल महामार्गावरील हिरानंदानीसमोरील पुलावर आयशर टेम्पो डिव्हायडरला धडकून आडवा झाल्याने झालेल्या भीषण अपघातात केबिनमध्ये अडकलेल्या चालकाला खारघर अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीच्या प्रयत्नाने बाहेर काढले. हा अपघात बुधवारी (दि. २) मध्यरात्री १२.१२ वाजण्याच्या सुमारास घडला.

एमएच ४३ सीई ७७३६ क्रमांकाचा टेम्पो मुंबई-पुणे लेनवरून जाताना पुलावर डिव्हायडरला धडकला. धडकेनंतर टेम्पो आडवा झाला व केबिनचा पुढील भाग चेपला गेला. त्यामुळे चालक अस्लम खान हे केबिनमध्ये अडकले होते. घटनेची वर्दी मिळताच खारघर अग्निशमन केंद्राचे पथक



तातडीने घटनास्थळी पोहोचले. जवानांनी स्प्रेडर उपकरणाच्या साहाय्याने वाहनाचा दरवाजा उघडून चालकाचा एक पाय मोकळा केला. त्यानंतर हायड्रॉलिक जॅकच्या साहाय्याने डॅमेज झालेले स्टेअरिंग आणि केबिनचा भाग बाजूला करण्यात आला. या प्रयत्नानंतर चालकाला सुरक्षितपणे केबिनबाहेर काढण्यात जवानांना यश आले. अपघातात चालक अस्लम खान यांच्या पायांना व तोंडाला दुखापत झाली आहे.

राम प्रहर

## श्रावणधारा

### श्रावणाच्या सरी

श्रावणसरी पडती दारा मंजुळ
गाणे गातसे वारा!
हिरवा शालू नेसली धरा
दारोदरी हा फुले मोगरा!
माळावरती गवत डूले
सासुरवासीण माहेरी झुले!
सणासुदीला लेकी या येती
मायची माया लेवून जाती!
श्रावण देई उल्हास मना
पानाफुलांचा साज देखणा!
क्षणात ऊन क्षणात सरी
लपंडावाची ही शिरशिरी!
मना आवडे श्रावण खेळ
सणांचा न्यारा जमला मेळ!



-सायराबानू चौगुले, माणगाव

# सर्वसामान्य जनतेच्या आयुष्यात ‘लाल परी’चे महत्त्व कायम -पालकमंत्री

## पोलादपूर येथील नूतन एसटी बसस्थानकाचे लोकार्पण



**पोलादपूर : प्रतिनिधी**

७५ वयापेक्षा अधिक वृद्धांना मोफत, महिला भगिनींना अर्ध तिकीट तर विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलत पास अशा सुविधा देणाऱ्या एसटी महामंडळाचे स्वातंत्र्यानंतर दुसऱ्या वर्षी सुरू झालेल्या लाल परीचे महत्त्व सर्वसामान्य जनतेच्या आयुष्यात कायम ठेवले आहे, असे प्रतिपादन रायगडचे पालकमंत्री तथा राज्याचे रोहयो खार जमीन विकास व फलोत्पादन मंत्री भरतशेठ गोगावले यांनी केले.

पोलादपूर येथील नव्याने बांधण्यात आलेल्या एसटी बसस्थानकाचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी सकाळी पार पडला. त्यावेळी मंत्री गोगावले बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रादेशिक व्यवस्थापक सागर पळसुले, राज्य परिवहन मुंबई प्रदेश कार्यकारी अभियंता मीनल सोनवणे, रायगड जिल्हा परिषदेचे शिक्षण, क्रीडा व अर्थ सभापती चंद्रकांत कळंबे, जि.प. सदस्य डॉ. निलेश कुंभार, पं. स.सभापती अविनाश शिंदे, तालुकाप्रमुख निलेश अहिरे, नगराध्यक्ष अस्मिता पवार व नगरसेविका तसेच शहरप्रमुख सुरेश पवार आणि ठेकेदार संजय चव्हाण तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.यावेळी मंत्री गोगावले यांचा सत्कार प्रादेशिक व्यवस्थापक सागर पळसुले व राज्य परिवहन मुंबई प्रदेश कार्यकारी अभियंता मीनल सोनवणे यांच्याहस्ते करण्यात आला.

यावेळी पालकमंत्री गोगावले यांनी, दुर्गम भागातील प्रवासी जनतेच्या सोयीसाठी बसस्थानकामध्ये कायमस्वरूपी एक जादा बस उपलब्ध ठेवावी, आंबेनळी घाटातील महाबळेश्वरपर्यंत विद्यार्थी, एमआयडीसीतील नोकरदार तसेच लोणेरे येथील तंत्रशास्त्र विद्यापीठापर्यंत विद्यार्थी ये-जा करू शकतील अशी गाडी सुरू करावी, अशा स्थानिक जनतेच्या मागण्या पूर्ण करताना एसटी बस प्रशासनाने महामंडळामध्ये नोकर भरती करताना स्थानिक उमेदवारांना प्राधान्य द्यावे, असा ठराव मंत्रिमंडळाच्या बैठकीत करणार असल्याचे सांगितले.

प्रारंभी प्रादेशिक व्यवस्थापक सागर पळसुले यांनी या बसस्थानकाचा लोकार्पण सोहळा गेल्या काही महिन्यांपासून रखडला होता. मंत्री गोगावले हे एसटी महामंडळाचे अध्यक्ष असताना या स्थानकासाठी निधी उपलब्ध झाला. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी प्राधान्याने हे काम पूर्णत्वास देण्यास सांगितले आणि आज ही इमारत एसटी महामंडळाच्या प्रवासी जनतेसाठी उपलब्ध झाली आहे, असे यावेळी सांगितले.

यावेळी मंत्री गोगावले यांनी अपेक्षा व्यक्त केल्यानुसार प्रादेशिक व्यवस्थापक सागर पळसुले यांनी आंबेनळी घाटातील रस्ता वाहतुकीसाठी सक्षम असल्याची पाहणी करण्यासाठी अनुकूलता दर्शविली.

## खालापूरच्या स्वामी समर्थ मठातील पादुकांची चोरी

**खालापूर : प्रतिनिधी**

खालापूर या तालुका ठिकाणी श्री स्वामी समर्थ यांच्या मठाची स्थापना ग्रामस्थांनी १४ मे २०२६ रोजी केली आहे. अल्पावधीत हे धार्मिक स्थळ निर्माण झाले असून परिसरातील अनेक स्वामी भक्त या ठिकाणी दर्शनासाठी येत आहेत. येथील चांदीच्या पादुका अज्ञात चोरट्याने चोरल्या.

हा मठ तहसील कार्यालयासमोर असून अगदी रस्त्याच्या कडेला असल्याने येणारे जाणारे भाविक येथे थांबून दर्शन घेतात. मठात तळमजल्यावर श्री स्वामी समर्थ यांचे ध्यान मंदिर आहे. बुधवारी (दि. २) रोजी सकाळी ८ वाजता पुजारी हे पहिल्या मजल्यावर श्री स्वामी समर्थ यांची पूजा करून खाली ध्यान मंदिरात पूजा करण्यास आल्यावर खाली मठा समोर उभा असलेला चोराने पहिल्या मजल्यावर येऊन त्याने



स्वामी समर्थ यांच्या समोर असलेल्या काचेच्या बॉक्स मधील पादुका घेवून फरारी झाला असून मठात असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरात दिसत आहे.

खालापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस यंत्रणा यांनी तपासाला सुरुवात केली असून चोर हे पनवेल दिशेकडे जाताना वाटेत असलेल्या सीसीटीव्ही कॅमेरेमध्ये दिसत आहे.पवित्र श्रावण महिना सुरू असल्याने भाविकांची संख्या दर्शनासाठी वाढत आहे.

## ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांना १५ सप्टेंबरपर्यंत मुदतवाढ

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

शासकीय वसतिगृह योजना, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार (OBC/SBC/VJNT/NT-A, B, D) व पंडित दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेंतर्गत (NT-C) ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळेस येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे व्यावसायिक व अव्यावसायिक अभ्यासक्रमातील नवीन विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेण्यासाठी प्रवेश अर्ज सादर करण्याकरिता वेळापत्रकात दि.१५ सप्टेंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, रायगड-अलिबाग सुनिल जाधव यांनी दिली आहे.या योजनेची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन https://hmasnew.mahait.org, राबविण्यासाठी वसतिगृह प्रवेश प्रणाली कार्यन्वित करण्यात आली आहे.

# एनएमसी कार्डची अट शिथिल करण्याची महिलांकडून मागणी



**मुरुड : प्रतिनिधी**

एन एम सी कार्डची नोंदणी केल्यानंतर ते एक महिन्याने प्राप्त होते. १ सप्टेंबरच्या अटीमुळे नोंदणी केलेल्या हजारो महिला सवलत तिकिटापासून वंचित आहेत. त्यामुळे एन एम सी कार्डची अट शिथिल करण्याची मागणी महिला वर्गाकडून होत आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात ग्रामीण भागाची जीवन वाहिनी असणाऱ्या एस. टी बस मधून सुमारे १७ लाख प्रवासी रोज प्रवास करीत असतात. शालेय विद्यार्थी ते ज्येष्ठ नागरिक तसेच राज्यातील सर्व महिला या आवडत्या एसटी मधून प्रवास करीत असतात. महाराष्ट्र राज्यात प्रथमच एस टी प्रवासात ५० टक्के तिकीट सवलत देण्यात आली आहे. १ सप्टेंबर पूर्वी सर्व महिला ५० टक्के सवलत बघताच क्षणी मिळत होती. परंतु आता १ सप्टेंबर पासून एन एम सी कार्ड सक्तीचे करण्यात आले आहे. महिला वर्ग अथवा ज्येष्ठ नागरिक प्रवास करताना हे कार्ड असेल तसेच या कार्ड मध्ये बॅलन्स असणे सुद्धा खूप आवश्यक आहे. तरच शासनाने जाहीर केलेली सवलत मिळणार आहे.

सदरच्या कार्डची नोंदणी केल्यानंतर ते एक महिन्याने प्राप्त होते. त्यामुळे १ सप्टेंबरच्या अटीमुळे नोंदणी केलेल्या हजारो महिला सवलत तिकिटापासून वंचित आहेत. कार्ड वेळीच न मिळाल्यामुळे शेकडो महिलाना पूर्ण तिकीट एसटी प्रवासात भरावे लागत आहेत. या बाबत असंख्य महिलांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, कार्ड नोंदणी झाल्यावर जी पावती दिली जाते त्या आधारावर तिकीट सवलत मिळावी अशी मागणी केली आहे तसेच या कार्ड मध्ये बॅलन्स रक्कमची अट रद्द करण्याची मागणी करण्यात आली आहे.


कार्ड दाखवल्यावर ५० टक्के रोख रक्कम वाहकाला देण्यास कोणतीच हरकत नाही. परंतु कार्ड मध्ये बॅलेन्स असण्याची अट रद्द करण्याची मागणी वाढू लागली आहे. याचे कारण कार्ड मध्ये बॅलन्स भरण्यासाठी मुख्य आगारात जावे लागते त्यामुळे वेळेचा अपव्यय होत असतो. खुपशा नागरिकांना बॅलेंक्स कसा भरावा याची माहिती नाही. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक व महिलांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे कार्ड मध्ये बॅलन्स असेल तरच सवलत अन्यथा पूर्ण तिकीट ही पद्धत बदलण्यात यावी.

# वेळेत साफसफाई न झाल्याने जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला करण्यास उशीर

**मुरुड : रामप्रहर वृत्त**

मुरुडचा जंजिरा किल्ला पावसाळ्याची ३ महिने समुद्र खवळल्याने व वादळी वारा मुळे पर्यटकांनसाठी २५ मे ला बंद केला जातो साधारण १ ऑगस्टला मासेमारी बोटी सुरु होतात .तसेच जंजिरा किल्ल्यात जाणाऱ्या १५ ऑगस्टपर्यंत सुरु होणे अपेक्षित आहे .मुरुडला पाऊस सुरु असल्याने जंजिरा किल्ल्यात मोठ्याप्रमाणात झाडी वाढल्याने किल्ला फिरणे पर्यटकांसाठी धोकादायक आहे .जर १५ ऑगस्टपर्यंत किल्ला पर्यटकांसाठी खुला करायचा असेल तर पुरातत्व खात्याने १५ दिवस अगोदर किल्ला सफाईचे काम सुरु करणे अपेक्षित आहे परंतु तसे होत नाही दरवर्षी निधी व कामाला मजूर मिळत नाही हि कारणे देऊन पुरातत्व खात्याचे अधिकारी कामाला सुरवात करत नाही

आता सप्टेंबर महिना सुरु झाला सफाईचे काम कधी होणार पुरातत्व खात्याचे अधिकारी -बजरंग येलीकर म्हणाले पाऊस थांबला कि सफाईचे काम सुरु होईल त्यानंतर किल्ला सुरु होईल पण दर रविवारी पर्यटक येतात जंजिरा किल्ला बाहेरून पाहून नाराज होऊन निघून जातात



जंजिरा किल्ला .दरवर्षी किल्ला पर्यटकांसाठी खुला करण्यासाठी उशीर होता याचा जाब कोणीच विचारत नाही .जंजिरा किल्ल्यासाठी ९३ कोटी खर्च करून पर्यटकांसाठी खास जेटी बांधण्यात आली आहे नूतन जेटीमुळे पर्यटक जाणे सुखकर झाले आहे परंतु झाडे सफाई काम पूर्ण होणे गरजेचे आहे .

मुरुड जंजिरा येथील आर्थिक विकास पूर्णतः पर्यटनावर अवलंबून आहे ,त्यासाठी जंजिरा किल्ला हे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण आहे .जंजिरा किल्ल्याची समुद्राच्या लाटांनी अनेक बुरुजाला मोठी भगदाडे पडलीत

आता ह्या पाऊसात तलावासमोरील दरवाजा पडला व दुरुस्तीची मागणी आम्ही नेहमीच करतो परंतु गर्ली १५ वर्षात एकदाही किल्याचे बुरुज दुरुस्तीला निधी आला नाही असे अधिकरी सांगतात .मग किल्यात प्रवेश तिकीट मधून मिळणारे पैसे जातात कुठे ती पैसे किल्ला दुरुस्तीसाठी वापरावे अशी मागणी होत आहे .

पर्यटक किल्ला पाहण्यासाठी सकाळी ७ वाजता जेटीवर हजार राहतात पण पुरातत्व खात्याचा कर्मचारी वर्ग ९ वाजता येतो त्यानंतर तिकीट मिळणार आणि किल्यात जाणार जर टिकीट देणारे कर्मचारी सकाळी ८ वाजता हजार झाला तर पर्यटकांची सोय होईल. किल्ल्यात सरपटणारे प्राणी असल्याने पर्यटकांना काहीवेळा दिसतात व भीतीचे वातावरण तयार होते, स्वच्छता झाली तर किल्ल्यात फिरणे सोपे हॉईल म्हणून पर्यटनसाठी जंजिरा किल्ला लवकर सुरु करावा.

# कर्जत-कल्याण राज्यमार्गावर दुभाजक बसवण्याची मागणी

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत-कल्याण रस्त्यावरील कर्जत - डोणे मार्गावर २१ किलोमीटर अंतरावरील दुभाजक तुटले आहेत. दुपदरी रस्त्याला दुभाजक नसल्याने अपघात घडत असतात आणि त्यामुळे नव्याने दुभाजक बसवण्यात यावेत अशी मागणी डिकसळ येथील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) कर्जत - खालापूर विधानसभा अध्यक्ष किशोर गायकवाड यांनी केली आहे. याबाबत त्यांनी मुख्यमंत्री कार्यालयात जाऊन या मागणीचे पत्र दिले आहे.

कर्जत तालुक्यातील कर्जत ते डोणे या सुमारे २१ किलोमीटर लांबीच्या मार्गावर रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक बसविण्यात यावेत. अशी मागणी किशोर गायकवाड यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडे निवेदनाद्वारे केली आहे. कल्याण कर्जत राज्यमार्ग रस्त्यावरील कर्जत ते डोणे हा



महत्त्वाचा मार्ग असून या मार्गावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. रस्त्याच्या मध्यभागी असलेले दुभाजक तुटले आहेत तर काही ठिकाणी दुभाजक नाहीत. रस्त्यावर दुभाजक नसल्यामुळे अनेक वाहनचालकांकडून चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक केले जाते. त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांशी धडक होण्याचा धोका निर्माण होऊन अपघातांच्या घटना घडत आहेत.विशेषतः रात्रीच्या वेळी हा धोका अधिक वाढतो.

या मार्गाचा वापर स्थानिक नागरिक, विद्यार्थी, कामगार तसेच दररोज प्रवास करणारे असंख्य वाहनचालक करतात. त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने रस्त्याच्या मध्यभागी दुभाजक बसविणे अत्यंत आवश्यक आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी कर्जत ते डोणे मार्गाची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक त्या ठिकाणी मध्यभागी दुभाजक, गतिरोधक,दिशादर्शक फलक आणि रिफ्लेक्टर बसविण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी. अशी मागणी त्यांनी केली आहे.

# नागावमध्ये वैद्यकीय शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील नागाव येथे ग्रामपंचायत नागाव व शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या मोफत वैद्यकीय शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागाव व परिसरातील मोठ्या संख्येने नागरिकांनी शिबिराचा लाभ घेत विविध वैद्यकीय तपासण्या करून घेतल्या तसेच मोफत औषधांचा लाभ घेतला.

नागाव ग्रामपंचायतीच्या सभागृहात दि. ३ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता या वैद्यकीय शिबिराचे आयोजन करण्यात आले. नागाव ग्रामपंचायतीच्या सरपंच हर्षदा मयेकर यांच्या पुढाकाराने हे शिबिर घेण्यात आले. शिबिरामध्ये रक्त तपासणी, रक्तदाब, वजन तसेच विविध आजारांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी करण्यात आली. नागरिकांना आवश्यकतेनुसार औषधांचेही मोफत वाटप करण्यात आले.

शिबिराला सरपंच हर्षदा मयेकर यांनी स्वतः उपस्थित राहून नागरिकांची विचारपूस केली. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, अलिबाग यांच्या वतीने औषधशास्त्र विभागाचे डॉ. सरबजीत मंडळ, प्रसूतिशास्त्र व स्त्रीरोग विभागाचे डॉ. सुदर्शन, बालरोग विभागाचे डॉ. सुव्हेर, दत्त विभागाच्या डॉ. हेतल गुजराथी, समाजसेवा अधीक्षक चित्रा ठाणगे, समाजसेवा अधीक्षक शुभांगी मोकल, अधिपरिचारिका अश्विनी बाप्टे, इबीनेबर वळवी, गौरी शिद, औषधनिर्माता दिपाली राजापुरे, प्रशिक्षणार्थी विशाल पाटील, प्रयोगशाळा तंत्रज्ञ निलेश भांडे यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले.



# आशियाई खेळांसाठी भारताचे जम्बो पथक जपानला जाणार




**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आशियाई खेळांसाठी ५०३ भारतीय खेळाडू, २४६ संघ अधिकारी आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांचे पथक जपानला जाणार आहे. क्रीडा मंत्रालयाने जपानमधील आयची-नागोया येथे १९ सप्टेंबरपासून सुरू होणाऱ्या २०व्या आशियाई खेळांसाठी ५०३ खेळाडू, २४६ संघ अधिकारी आणि सहाय्यक कर्मचाऱ्यांच्या भारतीय पथकाला मंजुरी दिली.

मंत्रालयाने यापूर्वी खेळांसाठी ४९२ खेळाडूंना मंजुरी दिली होती, पण अपेक्षेप्रमाणे प्रामुख्याने ॲथलेटिक्स संघातील अतिरिक्त नावांचा समावेश करण्यात आला आहे. या पथकात आता २६९ पुरुष खेळाडू आणि २३४ महिला खेळाडूंचा समावेश आहे.

भारतीय पथकात आता १९ संघ अधिकाऱ्यांसह एकूण ७६८ सदस्य असतील. यामध्ये संघप्रमुख सहदेव यादव आणि मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. दिनशॉ परडीवाला यांचा समावेश आहे. दुखापतग्रस्त भालाफेकपटू नीरज चोप्राशिवाय सहभागी होणाऱ्या ७९ सदस्यीय ॲथलेटिक्स पथकाला जास्तीत जास्त ३१ सहाय्यक कर्मचाऱ्यांसाठी मंजुरी देण्यात आली आहे. यामध्ये राष्ट्रीय प्रशिक्षक पी. राधाकृष्णन यांच्या नेतृत्वाखालील २० प्रशिक्षकांचा समावेश आहे.

व्हीव्हीएस लक्ष्मण यांच्या नेतृत्वाखालील पुरुष आणि महिला क्रिकेट संघांसाठी २० सहाय्यक कर्मचाऱ्यांना मंजुरी देण्यात आली आहे. ४ ऑक्टोबर रोजी संपणाऱ्या या खेळांमध्ये भारत ३६ क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होईल.

**स्टार खेळाडूंचा समावेश**

नेमबाज मनू भाकर, वेटलिफ्टर मीराबाई चानू, बॅडमिंटनपटू पीव्ही सिंधू, आयुष शेट्टी, लक्ष्य सेन आणि बॉक्सर लव्हलिना बोरगोहेन यांच्यासह अनेक स्टार खेळाडू भारताचे प्रतिनिधित्व करतील, मात्र भारताचा ऑलिम्पिक पदक विजेता नीरज चोप्रा आशियाई खेळांमधून बाहेर पडला आहे. तो दुखापतग्रस्त असून आगामी हंगामातील कोणत्याही स्पर्धेत सहभागी होणार नाही.

# तायक्वांदो चॅम्पियनशिपमध्ये ७००हून अधिक खेळाडूंचा सहभाग

## पनवेल महापालिका अकादमीला सर्वसाधारण विजेतेपद






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड तायक्वांडो असोसिएशनच्या वतीने पनवेलचे महापौर नितीन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त २५वी जिल्हास्तरीय चॅम्पियनशिप उत्साहात पार पडली. या स्पर्धेत ७००हून अधिक खेळाडूंनी सहभाग नोंदविला. स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपदाची ट्रॉफी पनवेल महानगरपालिका अकादमीने पटकावली.

स्पर्धेचे उद्घाटन कार्यसम्राट व लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून महापौर नितीन पाटील, माजी सभागृह नेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, सभापती, नगरसेवक प्रिन्सिपल अनुराग पांडे, एसएनजी इंटरनॅशनल स्कूलच्या प्रिन्सिपल डेबोलीनी राय उपस्थित होते.

स्पर्धेत सब-ज्युनियर, कॅडेट, ज्युनियर आणि सीनियर अशा विविध वयोगटांमध्ये खेळाडूंनी आपल्या कौशल्याचे प्रदर्शन केले. स्पर्धेतील सर्वसाधारण विजेतेपदाची द्वितीय क्रमांकाची ट्रॉफी कर्जत-खालापूर तालुक्यातील तेजश माळी संचालित ब्लास्टर अकादमीने, तर तृतीय क्रमांकाची ट्रॉफी माणगाव तालुक्यातील अक्षय पवार संचलित युनिक अकादमीने मिळविली. विजेत्यांना गौरविण्यात आले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी रायगड तायक्वांडो असोसिएशनचे पदाधिकारी, पंच, प्रशिक्षक, ब्लॅक बेल्ट, स्वयंसेवक, पालक आणि सर्व सहभागी अकादमींनी मेहनत घेतली.

# आशिया कपमध्ये श्रीलंकन गोलंदाजाने रचला इतिहास!

## पाच धावांत हॅट्ट्रिकसह घेतल्या सात विकेट्स



**दुबई : वृत्तसंस्था**

श्रीलंकेची कर्णधार चामरी अटापट्टू हिने आशिया कप स्पर्धेत नवा इतिहास रचला आहे. इंडोनेशियाविरुद्धच्या सामन्यात तिने २१ चेंडूंच्या स्पेलमध्ये अवघ्या पाच धावा खर्च करत तब्बल सात विकेट्स घेतल्या. १९व्या षटकात हॅट्ट्रिक पूर्ण करत तिने इंडोनेशियाचा डाव अवघ्या ४९ धावांत गुंडाळला आणि श्रीलंकेला ७५ धावांनी दणदणीत विजय मिळवून दिला.

पुरुष आणि महिला आशिया कप स्पर्धेच्या इतिहासात सात विकेट्स घेणारी चामरी अटापट्टू ही पहिलीच गोलंदाज ठरली आहे. आंतरराष्ट्रीय महिला टी-२० क्रिकेटमध्ये आतापर्यंत केवळ सहा गोलंदाजांनी सात किंवा त्याहून अधिक विकेट्स घेण्याची कामगिरी केली आहे. या यादीत अटापट्टूने थेट अव्वल पाचमध्ये स्थान मिळवले आहे.

याआधी आशिया कप स्पर्धेत सर्वोत्तम गोलंदाजीचा विक्रम पाकिस्तानच्या जावेरिया खान हिच्या नावावर होता. तिने २००८मध्ये बांगलादेशविरुद्धच्या सामन्यात आठ धावा देत सहा विकेट्स घेतल्या होत्या. आता चामरी अटापट्टूने तिचा हा विक्रम मागे टाकला आहे. चामरी अटापट्टूच्या आधी आशिया कप स्पर्धेत पाकिस्तानच्या तीन, तर थायलंडच्या एका गोलंदाजाने पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला होता. पुरुषांच्या टी-२० आशिया कप स्पर्धेत भारताचा भुवनेश्वर कुमार हा पाच विकेट्स घेणारा एकमेव गोलंदाज आहे.

# संस्कार सूर्यवंशीचे बॉक्सिंगमध्ये यश

**पनवेल : वार्ताहर**

तळोजा येथील द एलिट पब्लिक स्कूलचा इयत्ता दहावीचा विद्यार्थी संस्कार सोमनाथ सूर्यवंशी याने बॉक्सिंग स्पर्धेत यश प्राप्त केले आहे. सीबीएसई अंडर-१७ बॉक्सिंग स्पर्धेत सहभागी होत संस्कारने महाराष्ट्रात द्वितीय क्रमांक पटकावला असून त्याची आता राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

संस्कारच्या या उल्लेखनीय यशाबद्दल शाळा व्यवस्थापनाच्या वतीने त्याचा संस्थेचे चेअरमन बबन पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेच्या प्राचार्य अर्थप्रिया, क्रीडा शिक्षक नंदकुमार उपस्थित होते. त्यांनी संस्कारच्या कामगिरीचे कौतुक करून राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# रोहित शर्माच्या अनुभवाकडे दुर्लक्ष करू नका!

## जॉन्टी ऱ्होड्सचा बीसीसीआयला सल्ला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा माजी कर्णधार आणि धडाडीचा फलंदाज रोहित शर्मा याच्या भविष्याबाबत आणि आगामी २०२७ च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेतील सहभागाबाबत क्रिकेट वर्तुळात विविध चर्चा सुरू आहेत. अशातच दक्षिण आफ्रिकेचे महान माजी क्रिकेटपटू आणि जगातील सर्वोत्तम क्षेत्ररक्षकांपैकी एक असलेल्या जॉन्टी ऱ्होड्स यांनी युवा खेळाडूंच्या प्रतिभेला प्राधान्य देताना रोहितसारख्या खेळाडूंच्या अनुभवाकडे दुर्लक्ष करू नये, असे स्पष्ट मांडले आहे.



एका क्रीडा वाहिनीवरील चर्चेदरम्यान बोलताना जॉन्टी ऱ्होड्स यांनी विश्वचषक स्पर्धेतील मानसिक दबावाचा मुद्दा प्रकर्षाने मांडला. ते म्हणाले की, आपण अनेकदा नव्या खेळाडूंच्या कामगिरीचे कौतुक करतो आणि त्यांच्या उत्कृष्ट हंगामांनुसार संघाची रचना करतो, परंतु विश्वचषक स्पर्धेतील प्रचंड दडपण पेलण्यासाठी खेळाडूची केवळ शारीरिक क्षमता पुरेशी ठरत नाही, तर त्यासाठी लागणारी मानसिक कणखरता आणि अनुभव महत्त्वाचा असतो.

रोहित शर्माच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहत ऱ्होड्स यांनी त्याच्या जुन्या कामगिरीची आठवण करून दिली. रोहितने आपल्या कारकिर्दीत अनेक जागतिक स्पर्धा खेळल्या आहेत आणि महत्त्वाच्या टप्प्यांवर संघाचे नेतृत्व केले आहे. दबावाच्या प्रसंगात कशी कामगिरी करावी आणि संघाला संकटातून कसे बाहेर काढावे याचे उत्तम तंत्र रोहितकडे आहे. त्यामुळे २०२७च्या विश्वचषक मोहिमेत रोहितसारखा अनुभवी खेळाडू भारतीय संघात असणे अत्यंत गरजेचे असल्याचे ऱ्होड्स यांचे मानणे आहे.

### विराट कोहलीच्या जिद्दीचेही कौतुक

*यावेळी जॉन्टी ऱ्होड्स यांनी स्टार फलंदाज विराट कोहली याच्या जिद्दीचेही भरभरून कौतुक केले. ऑस्ट्रेलियन संघाप्रमाणेच विराटच्या मनातही प्रत्येक सामना जिंकण्याची कायम भूक असते, जी संघासाठी नेहमीच फायदेशीर ठरते, असे ते म्हणाले. एकंदरीतच, नव्या आणि युवा खेळाडूंना संधी देणे महत्त्वाचे असले, तरी विश्वचषक जिंकण्यासाठी रोहित आणि विराट यांच्यासारख्या अनुभवी खेळाडूंचे संघात असणे आणि त्यांचा अनुभव कामी आणणे भारतासाठी विजयाची गुरूकिल्ली ठरू शकते, असा विश्वास ऱ्होड्स यांनी व्यक्त केला आहे.*

# गिल-बुमराहच्या कसोटी क्रमवारीत घसरण

## पडिक्कलची मोठी झेप



**दुबई : वृत्तसंस्था**

आयसीसी कसोटी क्रमवारीत भारतीय कर्णधार शुबमन गिल आणि स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यांची घसरण झाली आहे. फलंदाजीच्या क्रमवारीत गिल दोन स्थानांनी घसरला, तर गोलंदाजीच्या क्रमवारीत बुमराह एका स्थानाने खाली आला आहे. दुसरीकडे, देवदत्त पडिक्कल ५४व्या स्थानावर पोहचला आहे. श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत सलग दोन शतके झळकावल्यामुळे त्याच्या क्रमवारीत कमालीची सुधारणा झाली आहे.

श्रीलंका दौऱ्यावर तीन डावांमध्ये केवळ एक अर्धशतक झळकावणारा गिल दोन स्थानांनी घसरून नवव्या स्थानावर आला आहे. यष्टीरक्षक-फलंदाज ऋषभ पंत सातव्या स्थानासह कसोटी क्रिकेटमधील अव्वल क्रमांकाचा भारतीय फलंदाज आहे. स्टार सलामीवीर यशस्वी जैस्वालच्या क्रमवारीत कोणताही बदल झालेला नाही आणि तो ११व्या स्थानावर कायम आहे. श्रीलंकेविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांमध्ये दोन शतकांसह ३२८ धावा करणारा पडिक्कल पाच स्थानांनी वर चढून ५४व्या स्थानावर पोहचला आहे.

पडिक्कलने गॉल कसोटीच्या पहिल्या डावात १६७ आणि दुसऱ्या डावात ४४ धावा केल्या होत्या, तर कोलंबो कसोटीत त्याने ११७ धावांची शानदार खेळी केली.

अनुभवी वेगवान गोलंदाज बुमराहने कसोटी गोलंदाजांच्या क्रमवारीत आपले दुसरे स्थान गमावले आहे. तो आता ऑस्ट्रेलियाचा मिचेल स्टार्क आणि न्यूझीलंडचा मॅट हेन्री यांच्या मागे तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. गुडघ्याच्या दुखापतीमुळे बुमराह श्रीलंका दौऱ्याला मुकला होता. अफगाणिस्तानविरुद्धच्या तीन सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठी त्याची भारतीय संघात निवड झाली आहे, पण त्याची उपलब्धता तंदुरुस्तीच्या मंजुरीवर अवलंबून आहे.

भारताविरुद्धच्या कोलंबो कसोटीच्या दोन्ही डावांमध्ये शतके झळकावणारा श्रीलंकेचा युवा फलंदाज सोनल दिनुशा आपल्या प्रभावी कामगिरीमुळे फलंदाजीच्या क्रमवारीत २९ स्थानांनी वर चढून २५व्या स्थानावर आला आहे. भारताने गेल्या महिन्यात श्रीलंकेविरुद्धची दोन कसोटी सामन्यांची मालिका १-०ने जिंकली. भारताने मालिकेतील पहिला सामना १६५ धावांनी जिंकला, पण श्रीलंकेच्या संघाला दुसरी कसोटी अनिर्णित राखण्यात यश आले.

# अमेरिकन ओपन : झ्वेरेवला सोनेगोने झुंजवले

**न्यूयॉर्क : वृत्तसंस्था**

कारकीर्दीत प्रथमच एखाद्या ग्रँडस्लॅम स्पर्धेत अग्रमानांकित म्हणून खेळणाऱ्या जर्मनीच्या ॲलेक्झांडर झ्वेरेवला अमेरिकन खुल्या टेनिस स्पर्धेत सलामीलाच तब्बल चार तास ५३ मिनिटे संघर्ष करावा लागला. पहिल्या फेरीच्या सामन्यात झ्वेरेवने इटलीच्या लॉरेन्झो सोनेगोवर ६-४, ३-६, ६-७ (७-९), ७-५, ६-४ असा संघर्षपूर्ण विजय मिळवला.

पहिले तीनपैकी दोन सेट गमावल्याने झ्वेरेव दडपणखाली होता. त्यातच चौथ्या सेटमध्ये ४-५ अशा पिछाडीवर असताना स्वतःच्या स्विहसवर एकवेळ त्याला ३०-३० अशा बरोबरीवर राहावे लागले होते. पराभवापासून तो केवळ दोन गुण दूर होता, मात्र त्या निर्णयाक क्षणी त्याने खेळावर नियंत्रण मिळवले आणि मॅरेथॉन लढतीतील संघर्षाचे विजयात रूपांतर केले.



अमेरिकेची टेनिसपटू कोको गॉफने महिला एकेरीत विजयी सुरुवात केली. गॉफने झेनेप सोनमेझचा ६-३, ६-४ असा पराभव केला. फिलिपिन्सच्या अलेक्झांड्रा एला हिने स्पर्धेची दुसरी फेरी गाठली. एलाने अमेरिकेच्या पात्रता फेरीतून आलेल्या मेरी स्टोयानाला ६-१, ६-२ असे नमवले. फ्रेंच स्पर्धेच्या विजेत्या मीरा आंद्रीवाने इंडोनेशियाच्या ३६व्या मानांकित जॅनिस तजेनवर ६-२, ६-२ असा विजय मिळवला. क्रमवारीत दुसऱ्या स्थानावर असलेल्या एलेना रायबाकिनाने अमेरिकेच्या थेआ फ्रॉडिनचा ६-३, ६-२ असा पराभव करत दुसरी फेरी गाठली.

**बेंचिच बिथरली**

महिला एकेरीत बाराव्या मानांकित बेलिंडा बेंचिचला कझाकस्तानच्या युलिया पुतिंतसेवाविरुद्ध ६-४, ५-७, ३-६ असा पराभव स्वीकारावा लागला. दुसऱ्या सेटमध्ये स्विहस भेदली गेल्यानंतर बेंचिच १-२ अशी मागे होती. तेव्हा तिने रागाच्या भरात मागे न पाहता कोर्टच्या पाठी जोरात चेंडू मारला, तो थेट प्रेक्षक गॅलरीत एकाला हलकासा स्पर्श करून गेला. या घटनेनंतर प्रतिस्पर्धी पुतिंतसेवा हिने २०२०मधील नोव्हाक जोकोविचच्या कृतीची आठवण करून देत बेंचिचला अपात्र ठरविण्याची मागणी केली, मात्र पंचांनी बेंचिचकडून ही चूक अनवधानाने घडल्याचे सांगितले.

# रोहित शर्माच्या निवृत्तीसंदर्भातील चर्चेला बीसीसीआयकडून पूर्णविराम

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) मुंबईतील आढावा बैठकीत रोहित शर्माच्या भवितव्यासंदर्भात काय निर्णय होणार याकडे सर्व क्रिकेट चाहत्यांच्या नजरा लागल्या होत्या. यावर भूमिका समोर आली आहे.

भारताचा माजी कर्णधार रोहित शर्मा २०२७च्या वनडे वर्ल्डकप स्पर्धेत खेळणार का? हा प्रश्न सध्या सातत्याने चर्चेत आहे. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये टीम इंडियाला जेतेपद मिळवून दिल्यानंतर बीसीसीआयने भविष्याचा विचार करत रोहितकडून वनडे संघाचे नेतृत्व काढून शुबमन गिलकडे सोपवले. त्यामुळे रोहितच्या भवितव्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले. टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर इंग्लंड दौऱ्यातील लॉर्ड्सच्या मैदानावर रोहित कारकिर्दीतील अखेरचा वनडे सामना खेळणार असल्याचीही चर्चा रंगली होती.

या पार्श्वभूमीवर मुंबईत झालेल्या बैठकीनंतर बीसीसीआय सचिव देवजित सैकिया यांनी एका वाक्यात रोहित शर्माच्या निवृत्तीसंदर्भात रंगणाऱ्या उलटसुलट चर्चेला पूर्णविराम दिला आहे. "रोहित शर्मा शानदार खेळतोय; अफवांना खतपाणी घालण्याची गरज नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे रोहितच्या भवितव्याबाबत सुरू असलेल्या चर्चांना सध्या तरी बीसीसीआयकडून सकारात्मक संदेश मिळाला आहे.

# आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी व्हीव्हीएस लक्ष्मण भारतीय पुरुष क्रिकेट संघाचे कोच

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बीसीसीआयच्या 'सेंटर ऑफ एक्सलन्स'चे (सीओई) क्रिकेट संचालक व्हीव्हीएस लक्ष्मण हे जपानमधील आइची-नागोया येथे होणाऱ्या आगामी २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेत भारतीय पुरुष संघाच्या प्रशिक्षकपदाची धुरा सांभाळणार आहेत.

क्रीडा मंत्रालयाने जाहीर केलेल्या प्रशिक्षकांच्या यादीनुसार, लक्ष्मण यांना सुनील जोशी, हृषिकेश कानिटकर आणि सुभादीप घोष यांची मदत मिळेल. यापूर्वी चीनमधील हांगझोऊ येथे झालेल्या २०२३च्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही लक्ष्मण यांनी भारतीय पुरुष संघाचे प्रशिक्षकपद भूषवले होते, जिथे भारताने सुवर्णपदक जिंकले होते.



नियमित मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर हे वेस्ट इंडिजविरुद्धच्या मायदेशातील वनडे मालिकेसाठी वरिष्ठ संघासोबत असतील. या मालिकेतील पहिला सामना २७ सप्टेंबर रोजी खेळवला जाणार आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेतील क्रिकेट स्पर्धा २४ सप्टेंबरपासून सुरू होईल आणि भारत आपला पहिला सामना चार दिवसांनंतर खेळेल.

अमोल मुजुमदार भारतीय महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून काम पाहणे सुरूच ठेवतील. मुजुमदार यांना गोलंदाजी प्रशिक्षक अविष्कार साळवी आणि क्षेत्ररक्षण प्रशिक्षक मुनीश बाली यांची मदत मिळेल. भारतीय महिला संघ थेट उपांत्यपूर्व फेरीतून स्पर्धेत प्रवेश करेल आणि जपानचा सामना करेल, तर पुरुष संघ 'गट अ' गटामधील दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या संघाशी भिडेल.

श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली भारत पुरुष टी-२० आशियाई क्रीडा स्पर्धेतील आपले विजेतेपद राखण्याचा प्रयत्न करेल. या संघात युवा फलंदाज वैभव सूर्यवंशी याचाही समावेश आहे. भारतीय महिला संघही आपले विजेतेपद राखण्यासाठी सज्ज असून संघाचे नेतृत्व हरमनप्रीत कौर करेल.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com